म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
ग्रं. क्र. १३९६

सन १९६










# स्वराज्यांतील गृहिणी

REFBK-0015239
REFBK-0015239





मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३३७५६ वि:
क्रमांक ... नों दि: ...
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५४३९
संदर्भ शाखा
REFBK-0015239
REFBK-0015239

# स्वराज्यांतील गृहाङ्गना

लेखक

वा. दा. गोखले

मूल्य

एक रुपया

प्रकाशक
ग. ल. ठोकळ
श्री लेखन वाचन भांडार
६२ बुधवार पेठ
पुणें २

मुखपृष्ठ
ग. वि. देशपांडे

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय,
शिव-पार्वती ४६१/४
सदाशिव पेठ, पुणें २

एषा मे वाङ्मयी पूजा गौरीशङ्करपादयोः ।
अर्पिता तेन देवेशः प्रीयतां मे सदाशिवः ।।

# उपकार

मराठी वाङ्मयांत
बखर साहित्याला ऐतिहासिक
व वाङ्मयीन
महत्त्व फार आहे.
त्या दृष्टीने
बखरी वाचत असतां
त्यांतील
अभिमानी वीर स्त्रियांचें
कार्य मन वेधून घेतें.
त्यांचें मार्गदर्शन
व वीरश्री निर्माण करणारीं वचनें
अनेक ऐतिहासिक घटनांना
कारणीभूत झालेलीं स्पष्ट दिसतात.
अशा टिपणांतून
प्रस्तुत पुस्तकांतील चरित्रें स्फुरलीं.
त्या सर्वांना
ऐतिहासिक आधार मिळविण्याचा
प्रयत्न केला असून
जुन्या बखरी, शिवदिग्विजय,
भा. इ. सं. मंडळाचे अहवाल,
प्रसिद्ध झालेले ऐतिहासिक कागदपत्र
आणि
रा. सा. सरदेसाई यांच्या रियासती
या सर्व साहित्याचा उपयोग केला आहे.

लेखक

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | जिजामाता | १ |
| २ | सईबाई | १३ |
| ३ | सोयराबाई | १७ |
| ४ | उमाबाई दाभाडे | २१ |
| ५ | आंग्र्यांची लक्ष्मीबाई | २६ |
| ६ | राधाबाई पेशवे | ३३ |
| ७ | गोपिकाबाई | ४६ |

अनुक्रम........ वि:
क्रमांक ........ नों. दि:
९५२३९

# स्वराज्यांतील गृहाङ्गना

## १. जिजामाता

**जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी।** हें तत्त्व भारतवर्षांत जितक्या उत्कृष्ट रीतीनें निदर्शनास येतें तसें इतर देशांत क्वचितच दिसून येत. विभूतिमत्त्वाचें बीज व्यक्तींच्या जन्माबरोबरच निर्माण होणारें असलें तरी त्या बीजाचें संवर्धन करणें ही अधिक महत्त्वाची जबाबदारी असते. आईबापांची कर्तव्यसफलता किंवा कर्तव्यच्युतता ह्या बीजसंवर्धनाच्या यशस्वितेवर किंवा अयशस्वितेवर अवलंबून राहते. स्वसुखाची किंचदपि पर्वा न करितां आपल्या मनाबरोबर तन आणि धन यांचेंहि दान पुत्राच्या मोठेपणासाठी ज्यांनी वेंचिलें व आदर्शभूत असें मातृपद शोभविलें अशा महनीय भारतवर्षीय महिलांत वीरमाता जिजाईचें नांव चिरकालीन राहील अशी ग्वाही इतिहास देत आहे. मराठी राज्य स्थापन करणारे श्री छत्रपति शिवाजीमहाराज ह्या महनीय विभूतीचा व्यक्तिविकास ह्याच जिजामातेकडून झाला; म्हणूनच तिला **राजमाता जिजाबाई** म्हणतात.

ह्या थोर स्त्रीचा जन्म १५९५ त झाला. तिच्या विवाहाचा योग अत्यंत विचित्र तऱ्हेने जमून आला. तिचे वडील लखूजी जाधव ऊर्फ जाधवराव हे देवगिरीकर यादव यांचे वंशज होते. शिंदखेडची देशमुखी, बारा हजार स्वारांची मनसब आणि भली मोठी जहागिरी देऊन निजामशहाने त्यांचा गौरव केला होता. मालोजी आणि विठोजी भोसले, हे शूर बंधु जाधवरावांच्या नोकरीस होते. परंतु आपल्या स्वाभिमानी व करारी स्वभावामुळे मालोजीचे

आपल्या स्वामीबरोबर नेहमी खटके उडत. लवकरच तो फलटणच्या निंबाळकरांच्या आश्रयास गेला. त्याचें शौर्य पाहून जगपाळराव निंबाळकर प्रसन्न झाला. आणि मालोजीचें त्याने आपली बहीण **उमाव्वा** हिच्याशीं लग्न घडवून आणलें. उच्च घराण्याशीं विवाहसंबंध झाल्यामुळे मालोजीचा दर्जाहि फार वाढला, आणि लवकरच निजामशहाची शिलेदारी त्याला मिळाली.

ऐहिक कीर्ति दिवसेंदिवस वाढत होती, तरी मालोजीच्या मनाला एक प्रकारची हुरहूर जाचत होती. लग्न होऊन बरींच वर्षें झालीं. मूल होईना. उमाव्वा पुत्रप्राप्तीसाठी रात्रंदिवस तळमळत होती. पुष्कळ दानधर्म केले. अनुष्ठानें चाललींच होतीं. बहुतेक देवांचे नवसहि पुरे झाले होते. अशा परिस्थितींत अहमदनगरजवळ शहाशरीफ नांवाचा कोणी मुसलमान अवलिया राहात असल्याचें तिने ऐकलें. पुत्रप्राप्तीसाठी तिने नवस केला आणि सुदैवाने तिच्या नवसास देव पावला. तिला दोन मुलगे झाले. शहाशरीफाच्या आशीर्वादाने पुत्रप्राप्ति झाली म्हणून तिने आपल्या मुलांचीं नांवें शहाजी व शरीफजी अशीं ठेविलीं.

जाधवरावांकडची नोकरी सुटली, तरी मालोजी त्यांच्याकडे वरचेवर जात येत असे. पुष्कळदां शहाजीहि आपल्या बापाबरोबर जाधवांच्या वाड्यांत जाई. हें त्याचें जाणें हळूहळू नित्याचेंच होऊन बसलें. कारण, जाधवांची मुलगी जिजा व शहाजी या उभयतांची प्रथम भेटीपासून बरीच गट्टी जमली. जिजा तीन वर्षांची आणि शहाजी चार वर्षांचा. दोन्ही मुलें देखणीं, खेळकर आणि आनंदी वृत्तीचीं. त्यांच्या बाललीलाचें अवलोकन व कौतुक करण्याला जाधवरावांच्या कुटुंबियांची नेहमीच तयारी असे.

१५९९ सालांतील होलिकोत्सवाचा दिवस उजाडला. पद्धतीप्रमाणे जाधवरावांकडे रंगपंचमीचा मोठा दरबार भरला होता. सभास्थानीं प्रमुख गृहस्थ

आणि सर्व आश्रित जमा झाले होते. मालोजीबरोबर शहाजीहि त्या समारंभास उपस्थित होता. मोठ्या प्रेमानें जाधवरावानें त्याला आपल्याजवळ बसविलें. लाडकी जिजाहि जवळच होती. रंगाचा खेळ चालू झाल्यावर बालस्वभावानुरूप तीं दोन मुलें एकमेकांवर रंग व गुलाल उधळूं लागलीं. स्वाभाविकच सभेचें लक्ष त्या मुलांच्या खेळाकडे गेलें. जाधवरावासहि कौतुक वाटून तो सहजगत्या म्हणाला, "हा जोडा मोठा सुंदर दिसतो नाही ?" जमलेल्या मंडळींतून अनुमतीचा "हो" हा शब्द चारी बाजूंनी निनादला. जाधवरावांच्या प्रश्नांतील अर्थ त्या लहान कोवळ्या मुलांना काय समजणार ! आपल्या बालवयास अनुसरून जवळच असलेल्या तबकांतील गुलाल त्या मुलांनी एकमेकांवर उधळला. जणू काय लग्नाला दोघांनी पूर्ण संमति दिली. थोड्याच वेळानें शांतता झाल्यावर मानी मालोजी उठून उभा राहिला आणि सर्वांना उद्देशून म्हणाला, "ऐका हो, ऐका. जाधवराव आजपासून आमचे व्याही झाले." आपण बोललों ही केवळ थट्टा होती, मालोजीनें आपल्या विनोदी शब्दांचें पर्यवसान खऱ्या व्यवहारांत केलें, ही गोष्ट जाधवरावांस आवडणें शक्य नव्हतें. तो ओरडून मालोजीस म्हणाला, "मुलांचें कौतुक करावें म्हणून मी बोललों. ती केवळ थट्टा होती. माझे शब्द आपण खरे मानूं नये". मालोजीस या उत्तरानें फार दुःख झालें आणि आपण गरीब म्हणून जाधवरावानें आपला पाणउतारा केला, ही गोष्ट त्याच्या मानी मनास लागून राहिली. समारंभ संपला. मंडळी आपआपल्या घरीं गेली.

शहाजीला घेऊन मालोजीहि स्वगृहीं परतला. त्याच्या मनांत सारखी कालवाकालव चालली होती. दुसऱ्या दिवशीं जाधवरावांच्या वाड्यांत इतर सरदारांबरोबर मालोजीलाहि जेवणाचें आमंत्रण आलें. परंतु मालोजी जेवणास गेलाच नाही. त्यानें जाधवरावांस एक चिठ्ठी पाठविली. "कालच्या भरसभेंत सर्वांसमक्ष तुम्ही आपली मुलगी आमच्या मुलास देऊं केली आहे; तेव्हा

मुलांच्या लग्नसमारंभाच्या वेळींच तुमच्याबरोबर भोजन होईल. मध्यंतरीं आपण मला बोलावूं नये."

मालोजीची चिठ्ठी वाचून जाधवराव आश्चर्यचकित झाले. जाधवरावाची बायको, म्हाळसाबाई तिलाहि भयंकर राग आला. बरोबरीचीं अनेक मराठे सरदार घराणीं असतांना यःकश्चित् गरीब बारगिराच्या पोराला आपली मुलगी द्यावी ही कल्पना त्या दोघांनाहि सहन झाली नाही. मालोजीकडे जाऊन जाधवरावाने त्याची पुष्कळ समजूत घातली; परंतु मालोजी कांही केल्या ऐकेना. जिजेचा आपल्या मुलाशीं विवाह झाला पाहिजे असा निश्चय करून मालोजी जाधवरावांची नोकरी सोडून चालता झाला.

---

मालोजी घर सोडून बाहेर निघाला खरा; परंतु जाधवरावाने केलेल्या अपमानाचें दुःख त्याच्या मनांत सारखें डंवचत होतें. आपण गरीब म्हणून आपला अपमान होतो, ही गोष्ट ध्यानांत येऊन वाटेल ते प्रयत्न करून आपण द्रव्य संपादन केलें पाहिजे, असा त्याने निश्चय केला. भीमा नदीचे काठीं पांडेपेड गांवाजवळ त्याची वतनवाडी होती. त्या ठिकाणीं भगवान् एकलिंगजीची त्याने मोठ्या भक्तिभावाने सेवा आरंभिली आणि त्या धर्माचरणाच्या भावनेंत साक्षात्कार होऊन मालोजीस एक मोठा द्रव्याचा ठेवा सांपडला. ह्या अकल्पित द्रव्यलाभाने त्याला मोठी उमेद आली आणि पुरातन देवळांचा जीर्णोद्धार, यात्रेकरूंना पाण्याच्या सोयीसाठी तलाव, अशा प्रकारची कित्येक धार्मिक व लोकोपयोगी कामें करून त्याने आपली प्रतिष्ठा वाढविली. त्याबरोबरच आपल्या हाताखाली त्याने लष्करी जमावहि उभारला. मालोजीची कीर्ति वेळोवेळीं जाधवरावांच्या कानीं जाई. परंतु आपली मुलगी शहाजीला द्यावी असें अद्यापहि त्याच्या मनांत येईना. जिजाबाईला मात्र वडिलांचें वर्तन नापसंत होतें आणि

शहाजीबरोबरच आपण लग्न करणारा असा आपला निश्चय तिने आईबापांच्या कानीं पुष्कळ वेळां घातलाहि होता.

मालोजीला मनुष्यबळ व द्रव्यबळ यांची उणीव राहिली नाही. त्याची प्रतिष्ठाहि इतर सरदारांच्या बरोबरीची झाली. एक दिवस त्याने मुलीची परत मागणी घातली. परंतु जाधवराव कबूल होईना. बादशहाच्या कानावर ही गोष्ट गेल्याशिवाय ह्या लग्नाचा बेत सिद्धीस जाणार नाही, असा विचार करून मालोजीने एक धाडसी योजना आखली. त्याने दोन डुकरें मारिलीं आणि त्या मारलेल्या डुकरांच्या गळ्यांत दोन चिठ्या बांधून दौलताबादेंतील एका मशिदींत नेऊन तीं टाकिलीं. हा प्रकार निजामशहाला कळतांच त्याने चौकशी आरंभिली. सरदारांनी त्या चिठ्या बादशहांच्या हातांत दिल्या. त्यांत असें लिहिलें होतें, कीं भरसभेंत जाधवरावांनी आपली मुलगी आमच्या मुलाला देण्याचें कबूल केलें परंतु ती गोष्ट आता ते नाकारीत आहेत. याउपर बादशहाने आमची दाद घेऊन आमचा लग्नाचा बेत पार पाडावा. नाहीतर असाच भ्रष्टाकार दुसऱ्या मशीदींत होईल. भोसले व जाधव यांची कौटुंबिक तेढ निजामशहा व त्याचा मुख्य कारभारी मलिकंबर यांना आधी ठाऊक होतीच. याच सुमारास उत्तरेंतील मोंगलांची वक्र-दृष्टि निजामशाहीवर वळली होती. अशा बिकट परिस्थितींत राज्यांतील मराठे सरदारांत यादवी उत्पन्न होणें इष्ट नव्हतें. जाधवरावांच्या मुलाखतीवरून बादशहास कळून चुकलें, कीं केवळ योग्यायोग्यतेचा पोकळ प्रश्न विवाहाच्या आड येत आहे. बादशाहाने मालोजीस दरबारांत बोलावून त्यांस पंचहजारी मनसबा शिवनेर व चाकण हे दोन किल्ले, आणि पुणें व सुपें हे दोन परगणे जहागीर म्हणून दिले आणि "राजे" हा किताब देऊन त्याची योग्यता जाधवरावा-पेक्षाहि अधिक वाढविली. जाधवरावाला ही गोष्ट आवडणें शक्य नव्हतें. त्याने मालोजीविषयीं बादशहाचें मन कलुषित करण्याचा भगीरथ प्रयत्न केला परंतु बादशहाचें मन पालटलें नाही. शेवटीं नाइलाज होऊन त्याने या लग्नसंबंधास

रुकार दिला. आणि हा संस्मरणीय विवाह स. १६०५ च्या डिसेंबरांत मोठ्या थाटानें पार पडला. प्रत्यक्ष बादशहाच या विवाहसमारंभास उपस्थित राहिल्यामुळें राज्यांतील एकूणएक अमीर उमराव, सरदार, धनिक, व्यापारी इत्यादि मोठमोठे लोक या प्रसंगासाठी एकत्रित झाले होते. एकंदरींत मार्गातील विघ्नें बाजूला होऊन मालोजीचा निश्चय मोठ्या अपूर्वाईने सिद्धीस गेल्यामुळे हा विवाह जिजा-शहाजीच्या आयुष्यांत क्रांतिकारक ठरला यांत आश्चर्य नाही.

दिवसेंदिवस मालोजी राजाचें वर्चस्व निजामशाहींत वाढत गेलें. शहाजी आपल्या बापासारखा शूर, धाडसी आणि निश्चयी निघाला. मालोजी राजाच्या मृत्युसमयीं शहाजी पंचवीस वर्षांचा होता. परंतु या वयांतहि बादशाही दरबारांत त्याचें वर्चस्व, वजन अधिक होतें. निजामशाही बुडविण्याचा शहाजहान बादशहाने निश्चय केला होता. दुर्दैवाची गोष्ट. जाधवरावहि याप्रसंगीं शहाजहानास मिळाला. बादशाही सैन्याच्या मदतीने जाधवरावाने निजामशाहीवर स्वारी केली आणि माहुलीच्या किल्ल्यांत शहाजी राहात होता, त्या किल्ल्याला वेढा दिला. शहाजीने सहा महिने किल्ला लढविला आणि मोंगलांना मेटाकुटीस आणिलें. परंतु निजामशाहाच्या आईच्या मनांत जाधवरावांच्या कृष्णकारस्थानांनी शहाजीविषयी वहीम उत्पन्न झाला. बादशहाची मर्जी उडाली. अशा प्रसंगीं जीव धोक्यांत घालण्याऐवजी किल्ला सोडून जाण्याचा बेत त्याने केला आणि संधि साधून निवडक लोकांनिशीं आपल्या कुटुंबासह शहाजी शत्रूच्या वेढ्यांतून निसटला. या वेळीं जिजाई सात महिन्यांची गरोदर होती आणि शहाजीचा वडील मुलगा संभाजी केवळ तीन वर्षांचा होता. दैवहि या प्रसंगीं शहाजीच्या विरुद्ध होतें. कुटुंबासह शहाजी निसटून गेला, ही बातमी जाधवरावाच्या कानीं गेली आणि आपल्या जामाताच्या पाठलागावर कांहीं निवडक सैनिकांसह तो निघाला. पुढे जांवई आणि मागाहून सासरा हा विचित्र योग.योग होता. बायको व मुलगा बरोबर नसता तर शहाजी केव्हांच शत्रूच्या हातावर तुरी देऊन गेला असता.

परंतु गरोदर बायको आणि चिमणा संभाजी यांच्यासह घोड्यावरून दौड करणें शहाजीस कठीण झालें. शाबास त्या वीर पत्नीची ! धीर न सोडतां जुन्नरपर्यंत त्या धीर स्त्रीने आपल्या पतीच्या बरोबरीने घोड्यावरून प्रवास केला. शेवटीं तिच्या पोटांत अतिशय दुखूं लागलें. एक पाऊलहि पुढें टाकणें तिला अशक्य झालें. ती घोड्यावरून खाली उतरली आणि आपल्या पतीला म्हणाली, " संभाजीला घेऊन पुढे व्हा. शत्रु अगदीं जवळ आला. मी येथे बसतें. माझी काळजी करूं नका."

आपल्या प्रत्यक्ष वडिलांना शत्रु लेखणाऱ्या या धैर्यशाली स्त्रीच्या भाषणाचें शहाजीला आश्चर्य वाटलें व आपल्याला अनुरूप स्त्री मिळाली याबद्दल त्या दुःखमय स्थितींतहि त्याला आनंदच झाला. प्रसंग मोठा बिकट होता. तशा अवस्थेंत जिजाबाईला तिथेंच सोडून जाणें ही गोष्ट शहाजीच्या मनाला पटली नाही. त्या अडचणींत त्याने एक तोड काढली. जुन्नरास श्रीनिवासराव नांवाचा एक सरदार त्याचा परम मित्र होता. त्याच्या साहाय्याने जिजाबाईला शिवनेरी किल्ल्यांत नेण्यांत आलें व संभाजीला घेऊन शहाजी फलटणास निघून गेला. जाधवरावाची मोठी निराशा झाली. आपल्या मुलीच्या हालअपेष्टा त्याच्या कानावर गेल्या, तेव्हा तिला भेटून आपणाबरोबर घरीं न्यावें या विचाराने जाधवराव जिजाबाईला भेटण्याकरिता शिवनेरी किल्ल्यांत गेला. बाप दृष्टीस पडतांच जिजाबाईचें अंग रागाने थरथरूं लागलें. ती तशा स्थितींतच आपल्या वडिलांस म्हणाली, " जा. इथून निघून जा. माझ्या पतीशीं हेवादावा करणारा, त्याच्यावर शस्त्र उगारणारा माझा बाप माझा शत्रूच आहे. पतीशीं वैर सुरू केल्या दिवसापासूनच तुम्हीं माझे शत्रु झालांत म्हणून भोसल्यांच्या शत्रूबरोबर मी कधीहि येणार नाही."

जिजाबाईचे हे कठीण बोल जाधवरावांच्या वर्मी लागले. त्याने तिचें मन वळविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. परंतु ती स्वाभिमानी वीरांगना

आपल्या निश्चयापासून अणुमात्रहि ढळली नाही. इतकेंच नव्हे, यापुढें जिजाबाई केव्हांहि माहेरीं गेली नाही. जें घराणें तिनें एकदां आपलें म्हटलें त्या घराण्याच्या अभिमानासाठी तिने आपलें सर्वस्व अर्पण केलें. ही गोष्ट खऱ्या आर्यस्त्रीला शोभण्यासारखीच होती. म्हणूनच जिजाबाईला "**वीरपत्नी**" हें उपपद सार्थत्वाने लावण्यांत येतें.

किती बिकट परिस्थितींत वीरपत्नी जिजाबाई शिवनेरी किल्ल्यावर राहिली याची आपण कल्पना करा. गरोदरपणा, त्यांत प्रत्यक्ष जन्मदाते आईबाप शत्रुतुल्य, राहण्याचें ठिकाण अनोळखी, आजूबाजूला मायेचें माणूस नाही. इतकें असूनहि तिनें धीर सोडला नाही. शिवनेरी किल्ल्यावरील शिवाई देवीला ती अनन्यभावें शरण गेली. आपलें बाळंतपण सुखरूपपणें व्हावें आणि आपणास पुत्र व्हावा, अशी देवीसमोर ती नित्य प्रार्थना करी. तिने देवीला नवसहि केला. देवी नवसास पावली. ता. १९ फेब्रुवारी १६३० रोजीं ती बाळंत झाली. मुलगा झाला. तिचें अंतःकरण आनंदाने भरून आलें. देवीच्या कृपेने मुलगा झाला, याच भावनेनें मुलाचें नांव "**शिवाजी**" असें ठेविलें.

याच सुमारास जिजाबाईच्या सुखमय संसारांत उद्विग्नता उत्पन्न करणारी एक घटना झाली. शहाजीने दुसऱ्या लग्नाचा घाट घातला. मोहित्यांच्या तुकाबाई नांवाच्या मुलीशीं दुसरें लग्न करून शहाजी कर्नाटकांत आपल्या जहागिरीवर निघून गेला. मायेचें माहेर मुकलें, सुखदुःखांचें विश्रंभस्थान पति तोहि त्याग करून गेला. साहजिक तिचें सर्व लक्ष "शिवाजी"वर बद्ध झालें.

मुसलमानी अंमलांत हरघडी होणारे अन्याय जिजाबाई दररोज पाहात असे, ऐकत असे. तिच्या सत्यप्रिय व न्यायी मनाला या गोष्टींचा पुरेपूर वीट आला होता. मुसलमानी राज्याचा खरा आधार मराठामंडळ आहे. असें असतां मराठ्यांनी स्वतःचें राज्य स्थापन न करतां यजमानांच्या सेवेंत सुख

मानावें, हें तिच्या स्वातंत्र्यप्रिय मनाला पटेना. पतिविरहाने या गोष्टीला जोराची चालना मिळाली आणि आपल्या शिवाजीच्या हातून हें महत्कार्य सिद्धीस जावें, असा तिने निश्चय केला. आपल्या घराण्यांत शककर्ता जन्मणार हा दृष्टांतहि ती विसरली नव्हती. शककर्ता शिवाजीच आहे अशी तिच्या भाविक मनाने खूणगांठ बांधिली. तिच्या या विश्वासाला दुजोरा देणारी दुसरीहि एक व्यक्ति तिथें होती. शहाजीने पुणें प्रांताचा कारभारी म्हणून दादोजी कोंडदेव यांची नेमणूक केली होती. दादोजी मोठा करारी, प्रामाणिक आणि स्वामिनिष्ठ होता. जिजाबाईचे व त्याचे विचारहि सारखेच जमत. त्यामुळे शिवाजीच्या शिक्षणाची या दोघांनी अत्यंत काळजी घेतली. घोड्यावर बसणें, शरसंधान अचूक करणें, भाला मारणें, तलवार चालविणें इत्यादि शूर मराठ्याला योग्य असें शिक्षण लहानपणींच शिवाजीला मिळालें. रामायण–महाभारतांतील वीरांच्या कथा सांगून शिवाजीच्या मनांत स्वाभिमान उत्पन्न करण्याची जिजाबाईची योजना सफल झाली. श्रीरामरायाने रावणादिकांचा वध करून जनतेला राक्षसांच्या त्रासांतून सोडविलें. आपणहि पवित्र स्थानांचा उच्छेद करणाऱ्या, मूर्ति फोडणाऱ्या, गाईचे कंठ बराचर चिरणाऱ्या यवनांच्या जाचांतून महाराष्ट्राची मुक्तता केली पाहिजे हे विचार बालशिवाजीच्या मनांत घोळूं लागले. मराठ्यांच्या दुर्बल स्वाभिमानरहित स्थितीविषयी बोलतांना जिजाबाईच्या डोळ्यांतून स्रवणारे अश्रु पाहून बालशिवाजीला अधिकच चेव येई व आपण यवनांचा नाश करून मराठ्यांचें स्वराज्य स्थापन केलें पाहिजे, हा त्याचा निश्चय अधिक बळावे. असें होतां होतां मुसलमानांच्या हातून होणाऱ्या जुलमाचें वर्तमान त्याला कोणीं कळविलें तर तो रागाने तांबडा होऊं लागला व त्याचा हात म्यानांतील तरवारीकडे जाऊं लागला.

हळूहळू शिवाजीचे मित्रसंघ तयार झाले. येसाजी कंक, तानाजी मालुसरे आणि बाजी फासलकर यांच्या साहाय्याने मावळांतील दऱ्याखोऱ्यांत राहणारे

शेंकडो मावळे त्याच्याभोवती जमले. शेवटीं तोरणा किल्ल्यावर त्यांनीं स्वराज्याचें तोरण बाधून आपल्या ध्येयभूत कार्याचा मंगल आरंभ केला. आपण दिलेल्या शिक्षणाचें सार्थक झालेलें पाहून जिजाबाईच्या नेत्रांत आनंदाश्रु उभे राहिले. दादोजीचेंहि प्रेमळ मन गहिंवरून आलें. दुर्दैवाने दादोजी यापुढे फार दिवस जगला नाही. तरुण शिवाजीला मुत्सद्देगिरीचा अनुभविक सल्ला देण्याची सर्व जबाबदारी जिजाईवर पडली. याच प्रसंगीं तिच्या अंगचे सद्गुण जगाच्या निदर्शनास आले. न्यायदानासारखीं महत्त्वाचीं कामें ती स्वतः पाहात असे. गरिबांचा परामर्ष घेणें, लढाईत शौर्याचीं कामें करणाऱ्यांना योग्य पारितोषिक देणें, लढाईत मृत्यु पावलेल्या लोकांच्या बायकांमुलांना योग्य साहाय्य करणें इत्यादि कामांबद्दल तिची चारी बाजूंस प्रशंसा होई. स्वराज्यस्थापनेला ज्या ज्या गोष्टी अनुकूल होतील, त्या त्या गोष्टी करण्यांत किंवा करवून घेण्यांत ती अत्यंत दक्ष असे. निंबाळकरांच्या धर्मान्तराच्या बाबतींत तिनें अंगिकारलेलें धोरण किती यशस्वी झालें !

शिवाजीच्या पराक्रमाची वार्ता बादशहाच्या कानापर्यंत गेली आणि शिवाजीचें पारिपत्य करण्याचा उहापोह दरबारांत चालू झाला. याच सुमारास बापाचा खून केला, या आरोपावरून बजाजी निंबाळकर हा बादशहाच्या कारागृहांत होता. भोसले आणि निंबाळकर हीं घराणीं नात्याने निगडित झालेलीं होतीं. साहजिकच निंबाळकराला सोडविण्याची खटपट शिवाजीकडून होणें क्रमप्राप्तच होतें. अशा परिस्थितींत निंबाळकराने मुसलमानी धर्म स्वीकारावा, नाही तर त्यास फांशीं द्यावें, असा विचार निघाला. बजाजीला धर्मान्तर करणें आवडत नव्हतें. परंतु प्रसंग पाहून त्याने मुसलमानी धर्म स्वीकारण्याचें कबूल केलें. बादशहा खुष झाला. निंबाळकराला त्याची पूर्वीची जहागिरी आणि नवीन प्रदेश देऊन त्याने त्याला आपला सरदार बनविलें.

३३७५६ दिः ... नोंः दिः ...

जिजाबाईला ही गोष्ट कळली तेव्हा तिला अनावर दुःख झालें. बजाजी-सारखा शूर, निधड्या छातीचा सरदार आपल्यांतून गेल्यास स्वराज्यस्थापनेंत थोडासा व्यत्यय येईल हें ती जाणून होती. निंबाळकराला परत हिंदुधर्मांत आणण्याचा उद्योग तिने आरंभिला. तिनें बजाजीची भेट घेतली. तोहि या गोष्टीस अनुकूल झाला. मोठ्या चाणाक्षपणे जिजाबाईने सर्वांची समजूत केली, सर्वांना शास्त्राधार दाखवून दिले आणि ब्राह्मणांकरवी निंबाळकराची शुद्धि करून त्यास परत आपल्या गोतावळींत आणिलें. इतकेंच करून ती धोरणी स्त्री राहिली नाही. कोणत्याहि मराठा कुटुंबाने मनांत किंतु आणूं नये म्हणून शिवाजीची मोठी मुलगी सखू बजाजीच्या मोठ्या मुलाला देऊन तिने भोसले–निंबाळकरांचा निकट संबंध जुळविला. तत्कालीन परिस्थितींत जिजाबाईनें केवढी मोठी समाज-सुधारणा केली बरें ?

शिवाजीचा स्वराज्याचा साहसी कारभार जोराने सुरू झाला. जिजाबाई त्याला योग्य सल्लामसलत देत होती. इतक्यांत त्यांच्यावर एक दारुण प्रसंग ओढवला. शहाजी शिकारीला गेला असतां घोड्यावरून पडला व त्याच अपघातांत ता. २३ जानेवारी १६६४ रोजीं तो मृत्यु पावला. या बातमीने सर्वांचा धीर खचला. शिवाजीच्या दुःखाला सीमा राहिली नाही. त्यांत जिजाबाईने सती जाण्याचें ठरविलें. आईच्या प्रेमळ पाखरीखाली इतकीं वर्षें काढलेल्या शिवाजीच्या मनाला आकाश कोसळल्यासारखें वाटलें. त्याने आईचे पाय घट्ट धरिले. सती न जाण्याबद्दल त्याने कळवळून विनंती केली. जिजामातेने दुःख गिळलें. वाढत्या स्वराज्यसंसाराकडे पाहून तिने आपला सती जाण्याचा बेत रद्द केला. शिवाजीचा जीव खाली पडला.

शिवाजीने हिंदुराज्य कसें स्थापन केलें हें आपणांस इतिहास सांगतच आहे. जिजामातेची एकच इच्छा अपुरी होती. योग्य काळ येतांच संधि साधून तिने आपली इच्छा शिवबाच्या कानांवर घातली व त्याला सांगितलें, कीं

शिवबा, आतां स्वतःस राज्याभिषेक करून घे आणि आपल्या शिक्क्याचीं नाणीं पाडून हा स्वराज्यसंसार अधिकाराने पुढे चालव.

आईच्या प्रेमळ आदेशाप्रमाणे शिवाजीने रायगड किल्ल्यावर ता. ६ जून १६७४ सालीं मोठ्या समारंभाने राज्याभिषेकोत्सव साजरा केला नि दृष्टान्ताची सफलता या नात्यानें राज्याभिषेक शक सुरू झाला.

जिजामातेचा आनंद गगनांत मावेना. तिचा आतां वृद्धापकाळ होता. केवळ पुत्राच्या विनंतीवरूनच ती इतके दिवस जगली होती. तिच्या जीविताचें जणू सार्थक झालें. राज्याभिषेकानंतर अवघे बाराच दिवस ती जगली. **धन्य ती वीरकन्या, वीरपत्नी, वीरमाता, जिजा !**

# २. सईबाई

शिवाजी महाराजांना अनेक स्त्रिया होत्या. पण त्यांत **सईबाई** नि **सोयराबाई** या दोघींचींच नांवें इतिहासप्रसिद्ध आहेत. **' गृहिणी सचिवः सखी मिथः '** या न्यायाने सईबाई आदर्शभूत वीरपत्नी म्हणून ख्यात आहे. या उलट राज्यलोभाने अंध होऊन आणि कुटुंबांत कलह उत्पन्न करून पतिनिधनाला प्रत्यक्ष नसली तरी पतिनिधन लवकर होण्याला सोयराबाई कारणीभूत झाली ! या दोघींचीं चरित्रें पुढे दिलेलीं आहेत.

शिवाजीमहाराजांनी महाराष्ट्रांत मराठे सरदारांच्या साहाय्याने स्वराज्य-स्थापना केली. तत्पूर्वींहि कांही मराठे सरदारांचीं घराणीं प्रसिद्धीस आलीं होतीं. अशा घराण्यांत फलटणच्या निंबाळकरांचें घराणें सर्वांत ज्येष्ठ आणि श्रेष्ठ समजलें जातें. सुमारें सातआठशें वर्षें निंबाळकर राज्योपभोग घेत आहेत. शिवाजी राजांच्या जन्माने पावन झालेल्या भोसले घराण्याचा निंबाळकरांशीं अत्यंत जुना घरोबा आणि त्यांतहि जिव्हाळा ओतप्रोत भरलेला. वेळोवेळीं सोयरिक संबंध जुळून या कुटुंबांतील प्रेमतंतु वृद्धिंगत होत गेला. मालोजीराव नाईक ( दुसरा ) निंबाळकर याची शूर, धाडसी आणि स्वाभिमानी कन्या ही मालोजी भोसले यांची पत्नी. तिचा बंधु जगपाळराव मालोजीवर सख्ख्या बंधूप्रमाणे प्रेम करी. याचमुळें प्रत्येक विकट प्रसंगीं तो मालोजीच्या साहाय्याला धांवून आल्याचीं उदाहरणें इतिहासांत आहेत.

जगपाळरावांच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा मुधोजी हा या घराण्यांत मुख्य पुरुष झाला. त्यानें दोन स्त्रिया केल्या होत्या. ज्येष्ठ स्त्रीला दोन मुलगे आणि धाकटीला बजाजी आणि सईबाई, मिळून त्याला चार मुलें होतीं. सवती-

सवतींचें आपापसांत भयंकर वितुष्ट. यामुळेच सावत्र भावाभावांत मारामाऱ्या, कलह उत्पन्न झाले आणि जहागिरीची अतोनात हानि झाली. पदरीं पैसा उरेना. मुधोजीने आजूबाजूस असलेल्या आदिलशाहीच्या प्रान्तांत बंडाळी सुरू केली. पण बादशहाने त्याचा चांगलाच समाचार घेऊन त्याला पकडलें नि सातारच्या किल्ल्यावर कारागृहांत ठेवून दिलें. या ठिकाणीं त्याला सात वर्षें कंठावीं लागलीं. मध्यंतरीं बजाजी आणि सई या लेकरांना त्रास होऊं नये म्हणून त्यांना त्याने साताऱ्यास आपणांजवळ आणून ठेविलीं.

याच सुमारास शहाजी राजे आदिलशाहींत उदयास आले होते, आणि दरबारांत नि मुख्यतः बादशहावर त्यांचें बरेंच वजन बसलें होतें. आपल्या घराण्यांतील मनुष्य कारागृहांत राहावा, हें उदारमनस्क शहाजीराजांस मानवलें नाही. ते मोठे मुत्सद्दी होते. संधि साधून त्यांनी बादशहाचें मन अनुकूल करून घेतलें आणि मुधोजीच्या कपाळींचा कारागृहवास संपला. या उपकाराची जणू फेड म्हणून मुधोजीने आपली कन्या सई ही शिवाजीस दिली. हा विवाह खिस्त शक १६३९ च्या सुमारास झाला असावा.

लग्नाच्या वेळीं सई केवळ 'सप्तवर्षा' होती. परंतु शहाजीराजांच्या घरीं तिची वारंवार ये-जा पूर्वीपासूनची असल्यामुळे आपण कुठे तरी दुसरीकडे अनोळखी मंडळींत राहावयास गेलों आहोंत असें सईला वाटलें नाही. त्यांत आईपेक्षांहि लाड करणारी प्रेमळ सासू! जिजाईच्या विलोभनीय प्रेमराज्यांत सई-बाईला अत्यंत उपयुक्त शिक्षण मिळूण ती गृहलक्ष्मी बनली, यांत विशेष आश्चर्य-कारक असें कांहीं नव्हतें. भावी सम्राटाची आदर्शभूत सम्राज्ञी होण्याला आव-श्यक गुण सईबाईच्या ठिकाणीं प्रादुर्भूत होण्यास जिजामातेचें वळण कारणीभूत झालें यांत शंका नाही.

शिवाजीचें सईबाईवर अतिशय प्रेम होतें, इतकेंच नव्हे तर, कवि-कुलगुरु कालिदासाच्या उक्तीप्रमाणें सईबाई 'गृहिणी सचिवः सखी मिथः' या

वर्णनांत येणारी ती स्त्री होती. 'कार्येषु मंत्रिः' या न्यायाने शिवाजी सईबाईशीं पुष्कळदा राजकारणप्रसंगीं सल्लामसलतीची चर्चा करी. आणि ती गुणवती स्त्री स्वराज्यस्थापना हेंच ध्येय डोळ्यांपुढे ठेवून, आपला स्वार्थ तिळमात्र विचारांत न घेतां योग्य तो सल्ला देई. असाच एक गमतीदार प्रसंग शिवदिग्विजयांत दिला आहे.

शिवाजीने विजापूरच्या राज्यांत एकच धुमाकूळ उडवून दिला. तो दिवसेंदिवस प्रबल होत चालला होता. इकडे बादशहाची चिंता वाढत चालली. बाप एकनिष्ठ सेवक, उलट मुलगा बंडखोरीचें निशाण फडकावितो. याच वेळीं शहाजी राजे कर्नाटक प्रांतीं गेले होते. त्यांना बाद-शहाकडून पत्र आलें कीं, 'तुम्ही आमचे एकनिष्ठ सरदार असतां तुमचा मुलगा बंडाळी करून मुलूख मारितो, किल्ले कोट घेतो, खजिना लुटतो. त्यास तुम्ही ताकीद द्यावी. आमची मेहेरबानी मिळवून तो वागत नाहीसा झाल्यास तुमच्यावर इतराजी होऊन तुमची जहागिरी काढून घेण्यांत येईल व तुम्हांस आणि तुमचे मुलास शासन होईल'. शहाजीनें शिवाजीला पत्र लिहून हा वृत्तान्त कळविला आणि 'तुम्ही पत्र पावतेक्षणींच निघोन येणें. कोणें विशीं अनमान न करणें' या अर्थाचा निरोप पाठविला. शिवाजीला मोठा विचार पडला. त्याने जिजाईचें मत घेतलें आणि या प्रश्नासंबंधीं सईबाईचें मत विचारण्यासाठी तो राणीवसांत गेला. सईबाईने शिवाजीचें स्वागत केलें. 'बादशहाकडील येण्याचा आग्रह वडिलांस संकटांत आपले चालीचे अर्थें उपद्रव होतो' इत्यादि भाव बोलून 'पुढे कसें करावें' असा प्रश्न राजाने सईबाईस केला. सईबाईने हात जोडून उत्तर दिलें, 'मसलतीचे अर्थ आह्मांस काय समजतात ? आमचा विपय, उत्तम चालीच्या असलों तरी घरांतील न्यून पूर्ण करावें, तथापि स्वामींची मर्जी; आज्ञाभंग होतो. यदर्थी विनंति जे, आपल्यास राज्य करावयाचें, त्यापेक्षा

माता, पिता, बंधु, आदि स्त्रियेचा लोभ सोडून असावें. तेव्हां राज्य प्राप्त होतें.' हें उत्तर ऐकून राजे परम संतोषी होऊन आलिंगन देऊन गौरव करिते झाले. या प्रकरणांतील नंतरची हकीकत म्हणजे शिवाजीने दिल्लीच्या बादशहाकडून विजापूरकरास शह कसा दिला, शहाजीची सुटका कशी झाली इत्यादि इतिहासांत दिली आहे.

शिवाजीच्या राणीवसांत सईबाईसारखी शांत स्वभावाची स्त्री दुसरी कोणी नव्हती. आपल्या पतीने स्वराज्यासाठी एवढा प्रचंड उद्योग चालविला आहे, याची जाणीव तीस पूर्णपणें होती. शिवाजीमहाराजांच्या कोणत्याहि कृत्याला तिने आडकाठी केली नाही; उलट राजकारणाचे डाव या दृष्टीने शिवाजीला आणखी विवाह करणें युक्त वाटलें, त्या वेळीं असूयायुक्त न होतां तिने त्या विवाहाला मनमोकळेपणाने अनुमति दिली.

शिवाजीचे अविश्रांत परिश्रम चाललेच होते. मध्यंतरीं सईबाईला १६५७ वर्षी पुत्ररत्न झालें. तेच संभाजीमहाराज होय. शिवाजीचें ऐश्वर्य वाढतच होतें. महाराष्ट्र स्वराज्याच्या तळमळीने जागा होऊन उद्योगाला लागला होता. १६५९ वर्ष उजाडलें. एकाएकीं सईबाई आजारी पडली. 'उपाय नाना प्रकारचे केले, गुण येईना, अधिकच चढ होऊं लागला. तेव्हां महाराजांस फार श्रम वाटले. संपूर्ण लोभ याचमुळें कांहीं चैन पडेना. क्षण-क्षणा जवळ जावें, बसावें, पाहावें, फार हैराण पाहिली म्हणजे उठावें, बाहेर यावें. श्रमी व्हावें.' शेवटीं अखेरचा दिवस उजाडला. प्रहर दिवसाचे सुमारास फार घावरी झाली आणि सायंकाळीं चार घटिका दिवस राहिल्यावर देह ठेविला' (शि. दि.) ही गोष्ट १६५९ च्या सुमारास झाली.

# ३. सोयराबाई

शहाजीमहाराज विजापुरास प्रधानत्वाने वागत होते. त्यांच्या अनुमतिविना राज्यांतील पानहि हालत नसे. बादशहाचा लोभ दिवसेंदिवस वाढत होता. याच सुमारास जिजाबाई आणि शिवाजी यांना शहाजींनी आपल्याकडे विजापुरास आणिलें. साहजिकच मातापुत्रांना अत्यंत आनंद झाला. पण महत्कार्य करण्यासाठी जन्मलेला शिवाजी विजापुरास थोडाच स्वस्थ बसणार होता. मुळांतच मुसलमानाविषयी तिटकारा आणि त्यांतून जिजाई मातेचें शिक्षण. विजापूरसारख्या मुसलमानी नगरांत प्रत्यहीं चाललेले हिंदुधर्मावरलि आघात शिवाजीच्या स्वाभिमानी मनास चैन पडूं देईनात. आघातास प्रत्याघात देण्याची त्याने तयारी केली. गोमासविक्री आणि गोवध यासंबंधी त्यानें मोठी चळवळ करून नगरांत एकच खळबळ उडवून दिली. मुलाच्या या तेजस्वी वर्तनाने शहाजीला मनांतून अत्यानंद होई, पण वरकडपणें मात्र शिवाजीला पित्याकडून खरमरीत तंबी मिळे. या प्रकारणाचा शेवट अखेरीस एका मुसलमान खाटिकाच्या वधांत झाला. असें असूनहि बादशहाला शिवाजीविरुद्ध म्हणजे अप्रत्यक्षपणें शहाजीविरुद्ध ब्र काढणें अशक्य होतें. उलट एक दिवस शहाजी राजे दरबारांत आले असतांना पहिल्यापेक्षा विशेष गौरव करून बादशहानें शिवाजीचें लग्न केलेंस का असा प्रश्न शहाजीस विचारला. 'तेसमयीं जाले म्हणून विनंती केल्यावरून, रागें भरून बोलले कीं, 'लग्न समारंभ करावे, तें राहून तुम्हीं आम्हीं नसतां लग्न केलें ! तें लग्न काय, खेळ जाला. दुसरें लग्न येथें करावयाचें म्हणून आज्ञा जाली. त्यावरून दुसरें लग्नाची योजना करून ठेवली' (शि. दि. १.) हीच शिर्के यांची कन्या **सोयराबाई** ही होय.

मोहिते, महाडिक, निंबाळकर, घाडगे, जाधव, शिर्के हीं जुनीं मराठे घराणीं. सचिवांचे ताब्यांतील मुसेखोऱ्यांत शिरकवली गांवीं अरण्यांत शिरकाई देवीचें पुरातन स्थान आहे. तेथें शिर्के घराण्याचा मूळ पुरुष येऊन राहिला. या घराण्यांतील मंडळी नंतर अनेक ठिकाणीं पसरली. सोयराबाई याच कुटुंबांतील होती.

सईबाईच्याहून अगदी भिन्न स्वभावाची ही बाई होती. अत्यंत कारस्थानी व स्वार्थी स्वभावामुळे ती राणीवसांत विशेष प्रिय झाली नाहीं. जिजाई जिवंत असेपर्यंत तर हिला कांहीच करतां आलें नाही. जिजाईच्या मृत्यूनंतर मात्र हिने आपल्या कारस्थानाचें जाळें पसरण्यास सुरुवात केली. त्यांत संभाजीच्या अप्रशंसनीय वर्तनाने हिला बराच जोर चढला. १६६१ या सालीं हिला मुलगा झाला. तोच राजाराम होय.

दुर्दैवाने शिवाजीचा उत्कर्ष पाहण्याचें भाग्य सईबाईला लाभलें नाही. यामुळे शिवाजीनें स्वतःला राज्याभिषेक केला, तेव्हा अग्रमहिषीचा मान सोयराबाईला मिळाला. या अभिषेकाच्या पाण्याने तिच्या जिभेलाहि पाणी सुटलें. आपला मुलगा राजाराम हा शिवाजीनंतर राजा व्हावा, ही इच्छा तिच्या स्वार्थी मनांत प्रादुर्भूत झाली; आणि या दृष्टीने तिने आपला उद्योग आरंभिला.

संभाजी शूर होता, पण लहरी आणि तामसी स्वभावाचा असल्यामुळे आपल्यामागे आपला राज्यशकट तो कसा काय वाहील, याविषयी शिवाजीला चिंता लागली होती. व्याकुलचित्त असलेल्या अशाच एका स्थितींत सोयराबाईने राजारामाला सिंहासनावर बसविण्यासंबंधींचें बोलणें काढलें. शिवाजीला तिचा प्रस्ताव आवडला नाही. संभाजीच्या दुर्वर्तनाने आधींच महाराजांचें चित्त विषण्ण असे, त्यांतून जिजाई माताहि निवर्तली आणि सोयराबाईचा हा उद्योग. याचा

परिणाम शिवाजीचे मनावर होऊन सोयराबाईविषयी त्याच्या मनांत एक तऱ्हेची अढी असली.

संभाजीला कैद करून पन्हाळगडावर ठेविला होता. सोयराबाईच्या कारस्थानांची गुणगुण शिवाजीच्या कानावर आलीच होती. इतक्यांत त्याला गुडघी रोगाने पछाडलें. चिटणिसांकडून बंदोबस्त ठेवण्याविषयी शिवाजीने किल्लोकिल्लीं हुकूम रवाना केले. अशा स्थितींतच १६८० ह्या वर्षी हा महापुरुष कालवश झाला.

शिवाजीच्या आकस्मिक निधनामुळे आणि त्याच्या मृत्युसमयीं विस-कटलेल्या कौटुंबिक परिस्थितीवरून शिवाजी विषप्रयोगानें मेला व त्याला सोयराबाई कारणीभूत होती, अशी एक वदंता चारी बाजूंस पसरली होती, शिवदिग्विजयांत शिवाजीचा मृत्युप्रसंग पुढीलप्रमाणे वर्णिला आहे—

'सदा मंगल, तेथें न्यून कोणताहि पदार्थ नाही. अशी ऐश्वर्यलक्ष्मी विराजमान, त्याठायीं बाईसाहेबांचे बुद्धीस अविचारबुद्धि उत्पन्न जाहली. आणि विषप्रलयें करून महाराजांस व्यथित केलें. महाराजांस जहाराचे झेंडू येऊन, एकाएकीं घाबरे व्हावे, हातपाय टाकावे, बोलणें चालणें राहिलें, डोळे फिरवावे, असे झाल्यामुळे वैद्य चिकित्सक बोलाविले त्यास दाखविलें,... शरीरास हिरवेपिवळेपणा चढत चालला...रायगडास हा प्रकार झाला. तो दिवस संकटाचा.' [ पृ. ४६२–६३ ]

विषप्रयोग ही केवळ लोकवदंता होती आणि सोयराबाईच्या स्वार्थी कारस्थानामुळे लोकांना ती त्या वेळीं खरी वाटणें अधिक संभवनीय आहे.

शिवाजीच्या मृत्यूसमयीं संभाजी दूरच होता. राजाराम मात्र घरीं होता. या परिस्थितीचा फायदा घेऊन सोयराबाईने अण्णाजी दत्तो, मोरोपंत पिंगळे,

प्रल्हाद निराजी, रामचंद्रपंत अमात्य इत्यादि मंत्रिमंडळांतील भल्याभल्या लोकांस आपल्या बाजूस वळविलें आणि राजारामास गादीवर बसवून त्याच्या नांवानें राज्यकारभार सुरू केला. बाळाजी प्रभू चिटणीस मात्र या कारस्थानांत शिरला नाही. कारण मूळपासूनच त्याचा ओढा संभाजीकडे होता. यामुळे सोयराबाईच्या कटाची इत्थंभूत वार्ता संभाजीस पन्हाळ्यावर समजली. तत्क्षणीं त्यानें आपली सुटका करून घेतली. पन्हाळा ताब्यांत घेतला आणि रायगडावर येऊन दाखल झाला. रागाच्या भरांत सोयराबाईला साहाय्य करणाऱ्या सरदार मंडळींपैकी पुष्कळांस त्यानें ठार मारलें. राजारामास कैद केलें आणि सोयराबाईकडे जाऊन, 'तुम्ही राज्यलोभास्तव महाराजांस विष-प्रयोग करून मारिलें', असा आरोप शब्द बोलून भिंतीच्या कोनाड्यांत तिला चिणून टाकिलें. तेथें अन्नपाणी न मिळून तिसरे दिवशीं तिचा प्राण गेला.

♥

९४२३८

# ४. उमाबाई दाभाडे

भोसले, जाधव, घोरपडे वगैरे अनेक मराठे घराणीं शिवाजीच्या वेळीं प्रसिद्धीस आलीं. या व इतर घराण्यांत उत्पन्न झालेल्या वीर पुरुषांनी देशाची उत्कृष्ट सेवा केली. शिवाजीच्या प्रत्यक्ष नजरेखाली त्यांना शिस्त व राज्यकारभार यांचें नमुनेदार शिक्षण मिळाल्यामुळे मुसलमानांच्या हातून स्वराज्याचा बचाव करणें त्यांना सोपें गेलें. याच घराण्यांपैकी दाभाड्यांचें घराणें असून, खंडेराव दाभाड्याने तर शिवाजीच्या मागे अवर्णनीय देशसेवा केली.

खंडेराव दाभाडे, हा शाहू छत्रपतीचा सेनापति होता. त्याचें शौर्य, स्वामिभक्ति, कर्तबगारी इत्यादि गुणांवर प्रसन्न होऊन, शाहूने त्याला चाकण-पारनेर ह्या परगण्यांत मोठमोठ्या जहागिरी दिल्या. त्याचें राहतें ठिकाण तळेगांव असल्यामुळे त्या गांवास दाभाड्याचें तळेगांव म्हणतात.

खंडेरावाची स्त्री जानकी ऊर्फ उमाबाई ही आपल्या नवऱ्याप्रमाणेच बाणेदार व अत्यंत मुत्सद्दी होती. तिला आठ मुलगे – पैकीं त्रिंबकराव, यशवंतराव आणि बाबुराव हे तिघेच फक्त वांचले.

खंडेरावाची स्वराज्यसेवा दीर्घकाल चालली. शिवाजी, संभाजी, राजाराम नि शाहू या सर्वांच्या कारकीर्दी त्याने पाहिल्या. आतां तो वृद्ध झाल्यामुळे शाहूने त्याला विश्रांति घ्यावयास सांगितलें व त्याच्या ज्येष्ठ चिरंजिवास (त्रिंबकराव) सेनापतीचीं वस्त्रें अर्पण केलीं. त्रिंबकरावहि कांही कमी शूर नव्हता. भाला फेकण्याबद्दल त्याची फारच ख्याति होती. त्याचा भाला सात तवे फोडून जाई, इतकें त्याचें बाहुबल होतें असें म्हणतात.

खंडेराव दाभाडे मृत्यु पावल्यानंतर शाहूच्या आज्ञेवरून त्रिंबकराव गुजराथ प्रांताच्या मोहिमेवर निघाला. त्याच सुमारास बाजीराव माळव्याच्या मोहिमेवर निघाला होता. दोघेहि अतुल वीर, कट्टे स्वामिभक्त पण मनांतून एकमेकांविषयी जळत असत. मोहीम सुरू होण्यापूर्वी जिंकलेल्या प्रांतांतील अर्धा अर्धा भाग एकमेकांनी एकमेकांस द्यावा, अशा अर्थाचा निरोप बाजीरावाने त्रिंबकरावास पाठविला. त्रिंबकरावाने ही गोष्ट कबूल केली नाही. उलट 'छत्रपतींच्या आज्ञेशिवाय कांही करतां येत नाही,' असा रोखठोक जबाब त्यानें पेशव्यांकडे पाठवून दिला. ही रदबदली शाहूमहाराजाकडे गेली. तेव्हा शाहूने त्यांना आज्ञा केली कीं, माळव्यांत बाजीरावाने अंमल करावा व गुजराथेंत दाभाडे अंमल करील.

इतकें झालें असतांहि पेशव्यांना ही योजना न आवडून, त्यांनी गुजराथ-जवळील डभई प्रांतावर आपला अम्मल बसविला. दाभाडे आपलें सैन्य घेऊन डभईजवळ आला. लढाई जुंपली. एका दुष्ट फितुराने सेनापतीवर गोळी झाडली. त्रिंबकराव जखमी होऊन मृत्यू पावला. ही गोष्ट उमाबाईस कळली. ती रडत नाही बसली! आपल्या दोघां मुलांस घेऊन ती फौजेंत आली. तिच्या प्रोत्साहनाने फौजेलाहि धीर आला. तिने पेशव्यांवर जोराचा हल्ला चढविला. पेशवे मागे हटले व साताऱ्यास शाहूकडे आले. महाराजांकडे त्यांनी आपला गुन्हा कबूल केला व पारिपत्य करणें तें करावें, अशी विनंती केली.

शाहूमहाराजांना मोठाच पेंच पडला. गुन्हा पेशव्यांचा, पण क्षमा न करणें म्हणजे पेशव्यांनी व त्यांच्या वडिलांनी आतापर्यंत केलेल्या कामगिरीची उपेक्षा केल्यासारखें होतें. बराच वेळ विचार करून शाहूने बाजीरावास क्षमा केली. मागाहून दाभाडे साताऱ्यास आले. त्यांना ही क्षमेची गोष्ट कळली. त्यांना कांहीच करतां येणें शक्य नव्हतें. उमाबाईच्या सांगण्यावरून त्यांनी एक युक्ती योजिली. दोघांनीहि आपल्या तरवारी शाहूपुढे नेऊन ठेविल्या व हात जोडून विनंती केली,

" महाराजांच्या आज्ञेवरूनच आम्हीं गुजराथेवर स्वारी केली. पेशव्यांनी प्रथम कुरापत काढली. त्यांनी आम्हांस दगा दिला, असें असूनहि त्यांस आपण पाठीशीं घातलें; यांत आम्हीं काय करावें ? "

असें म्हणून त्यांनी शाहूच्या पायांवर डोकें ठेविलें व तळेगांवचा रस्ता सुधारला. शाहूच्या या वर्तनाने उमाबाईस अत्यंत दुःख झालें. दाभाड्यांची समजूत न होतां, त्यांनी बाणेदारपणाने तरवारीचा त्याग केला, ही गोष्ट शाहूच्या मनाला फारच लागली. उमाबाईची योग्यता तो जाणून होता. दाभाडे घराणें आपल्या शत्रुपक्षांत जाणें ही गोष्ट घातुक आहे हें त्यास समजत होतें. उमाबाईची समजूत करण्यासाठी बरोबर पेशव्यास घेऊन स्वतः तो तळेगांवास आला. प्रत्यक्ष छत्रपति आपल्या घरीं आलेले पाहून कोणता स्वामिभक्त अपमान विसरणार नाही ? उमाबाईचें अन्तःकरण भरून आलें व तिने महाराजांचें यथायोग्य स्वागत केलें.

शाहूने धोरणीपणाने उमाबाईची समजूत घातली. तो म्हणाला, " खंडेराव बाळाजी पेशव्यांस आपला भाऊ समजे. दोघेहि एकदिलाने व एकमताने वागत. बाळाजीचा मुलगा बाजीराव. त्याला तुम्ही आपल्या त्रिंबकरावाप्रमाणेच समजलें पाहिजे, नाही का ! त्याचा अपराध झाला, आता त्याला तुमच्या पायांवर घातलें आहे, तुम्हीच आपल्या हाताने मारा ! " असें म्हणून शाहूने उमाबाईपुढे तरवार ठेविली व बाजीरावाला तिच्या पायांवर घातलें.

शाहूची युक्ति तर बिनतोड होती. उमाबाई शान्त झाली. तिचा राग मावळला. बाजीरावाला तिने वर उठविलें. ती शाहूला म्हणाली, " महाराज, आपण आमचे पोशिंदे, आम्ही आपले सेवक. आज्ञा कराल ती मान्य केली पाहिजे. तुम्ही मला पेशव्याची आई म्हटल्यावर कोणत्या हाताने त्यांच्यावर शस्त्र उगारूं ? "

उमाबाईच्या या क्षमाशीलत्वाने शाहूला फार समाधान झालें व त्याने दाभाडे बंधूंना सेनापतीचीं वस्त्रें–भूषणें देऊन त्यांचा सन्मान केला.

उमाबाईच्या मुलांना शाहूने थोर पदाला चढविलें खरें पण ते दोघेहि वयाने लहानच होते, त्यामुळे सर्व कारभार उमाबाईच पाहात असे. उमाबाईच्या कर्तबगारीची कसोटी पाहण्यासाठीच जणू पुढील प्रसंग तिच्यावर आला, आणि त्या प्रसंगाने तिच्या चिकाटीची, वीरश्रीची आणि अभिमानाची परीक्षा झाली.

अहमदाबादेजवळ मोगलांचा एक सुभा होता. तेथील सुभेदाराने गुजराथ प्रांतांत दंगल माजवून मराठ्यांचीं कांही ठाणीं उडविलीं, शाहूने त्या सुभेदाराच्या बंदोबस्ताचें काम उमाबाईवर सोपविलें व तिला स्वारी करण्याची आज्ञा केली. आज्ञेप्रमाणे ती शूर स्त्री आपल्या मुलांसह स्वारीवर निघाली. उमाबाई आपल्यावर चाल करून येत आहे, ही बातमी त्या मोंगल सुभेदारास जेव्हा कळली तेव्हा त्या चढेल मोगल सरदारास हंसूं आवरेना. यःकश्चित् स्त्री आपल्याशीं लढण्यास उद्युक्त झालेली पाहून, त्यानें उमाबाईस निरोप पाठविला – " ×× बायको आहेस. तुझीं मुलेंही लहान आहेत. लढाई हा बायकांचा खेळ नाहीं. तूं परत जावं हें बरं. आम्ही बोलून चालून मुसलमान आहोंत, हें लक्षांत ठेव ! "

या अपमानास्पद निरोपाने उमाबाई भयंकर रागावली. त्या शूर स्त्रीने आपल्या सर्व सरदारांस एकत्र केलें, त्यांच्यासमोर बांगड्या व कुंकू ठेवून ती म्हणाली, " मी बायको माणूस म्हणून त्या पठाणानं माझा पाणउतारा केला, याची तुम्ही चाड बाळगा. तुम्ही सेनापतीचे नोकर. सेनापति आज माझ्या ताब्यांत आहे. तेव्हा मीं शपथ घेतली आहे कीं, अहमदाबादेच्या राजवाड्यांत जाईन तेव्हांच अन्न घेईन. तुम्हांस तुमच्या अन्नाची शरम असेल, तर आमच्याबरोबर यावं. मरणास भीत असाल तर ह्या बांगड्या हातांत घालून, अन् हें कुंकू लावून खुशाल आपल्या कुटुम्बांत परत जा ! "

ह्या वीरश्रीच्या भाषणाने सर्व सरदारांस आवेश चढला. ते उमाबाईस मुजरे करून गर्जून बोलले, "आईसाहेब, आम्ही आपलं निमक खाल्लं आहे. आम्ही मरणाला भीत नाही. शत्रूला भीत नाही. शत्रूला पायाखालीं तुडवूं नाही तर मरून जाऊं, पण माघारे फिरणार नाहीं. आपण आमची मौज पाहावी!"

मारूं कीं मरूं या आवेशाने सर्व सैन्य शत्रूवर चालून गेलें. उमाबाई अंबारींत बसली होती. तिच्या हातांत तलवार होती. दोन्ही बाजूंस दोन्ही मुलगे हत्तीवर बसून चालले होते. आपल्या निरोपास भीक न घालतां उमाबाई आपल्यावर चाल करून येत आहे हें पाहून तो मोगल सुभेदार दहा हजार स्वारानिशीं पुढे आला. मोठ्या निकराची झटपट झाली. मराठ्यांनी पराक्रमाची शिकस्त केली. मोगल सैन्य मागे सरूं लागलें, वीरश्रीला चढलेले मराठे पाठलाग करूं लागले. मराठे आत येऊं नयेत म्हणून मोगलांनी किल्ल्याचे दरवाजे बंद केले, पण मराठे थोडेच थांबणार होते!

त्यांनी रणांगणांतील प्रेतांचा ढीग तटाजवळ रचिला व त्यावर चढून दरवाज्याला आग लाविली! दरवाजा जळतांच किल्ल्याचा मार्ग मोकळा झाला. मराठे धडाडीने आत शिरले. त्यांना पाहतांच शत्रूंची तारांबळ उडाली. मराठ्यांनी किल्ला सर केला. उमाबाईने अन्नग्रहण केलें.

शहराचा बंदोबस्त झाल्यावर उमाबाई छत्रपतीच्या दर्शनास साताऱ्यास गेली. तिच्या पराक्रमाने शाहू आनंदित झालाच होता. त्याने तिचें स्वागत केलें, व तिला सोन्याचा तोडा बक्षीस दिला. अशा रीतीने या शूर व वीरमातेचा गौरव करून व तिला वस्त्रेंभूषणें, हत्ती, घोडे इत्यादि देऊन शाहूने तिची रवानगी तळेगांवास केली.

♥

# ५. आंग्र्यांची लक्ष्मीबाई

१६६१ सालची गोष्ट. शिवाजीमहाराजांचा अंमल जारीने सर्वत्र सुरू झाला होता. कोकणपट्टीचा बहुतेक भाग त्यांच्या स्वामित्वाखाली होता. पण या ठिकाणीं समुद्र नजीक असल्यामुळे नुसत्या जमिनीवर लढाई करणाऱ्या सैन्याचा विशेष उपयोग होत नसे. मुसलमान, फिरंगी, इंग्रज इत्यादि एतद्देशीय व परदेशीय शत्रूंना तोंड द्यावयाचें तर आरमाराची जय्यत तयारी आवश्यक होती. महाराजांच्या ध्यानांत ही गोष्ट येतांच त्यांनी विविध तऱ्हेने मिळविलेली संपत्ति आरमाराची सिद्धता करण्यांत खर्च करण्यचें ठरविलें. जहाजें बांधण्यासाठी व वेळ पडेल त्या वेळीं सुरक्षितता मिळावी म्हणून सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, रत्नागिरी, कुलाबा, अंजनवेल इत्यादि योग्य ठिकाणीं गोद्या व किल्ले उभारण्यांत आले.

रणक्षेत्रांत सर्वस्व अर्पण करणारे योद्धे जसे प्रसिद्धि पावले त्याचप्रमाणे समुद्रावरील अचाट शौर्याने अतुल स्वामिनिष्ठेसाठी धारातीर्थी देह ठेवणारे अनेक पुरुष स्वराज्यांत ख्यातनाम झाले. स्वराज्यांतील विविध राजकारणांत स्त्रियांनीहि स्मरणीय कामगिरी केलेली दिसून येते. अहिल्याबाई, राधाबाई, गोपिकाबाई, आनंदीबाई, झांशीची लक्ष्मीबाई यांचीं नांवें सर्वतोमुखीं आहेतच. लष्करी विद्येंत प्राविण्य मिळविलेल्या स्त्रियांचीं अनेक उदाहरणें देतां येतात. आरमार खात्यांत दर्यावर्दीपणांतसुद्धा कांहीं स्त्रिया निष्णात होत्या यांत शंका नाही. आंग्रे घराण्याचा लौकिक राखण्यासाठी जिवापाड श्रम करणारी ललनाललाम **लक्ष्मीबाई** ही अशांपैकीं एक होय.

मराठ्यांच्या राज्यांत आरमारखात्याला बरेंच महत्त्व दिलें जाई. "आरमार म्हणजे स्वतंत्र एक राज्यांगच आहे. जसें ज्यास अश्वबल तशी

त्याची वृद्धिप्रथा आहे, तद्वतच ज्याजवळ आरमार त्याचा समुद्र याकरितां आरमार अवश्यमेव करावे." ( आज्ञापत्र ) अशी स्वराज्यांतील राजनीति होती. कोंकणांतील समुद्रानजीक राहणाऱ्या अनेक घराण्यांना आपली मर्दुमकी दाखविण्याची ही संधि होती. पुष्कळ कुटुंबांनी त्या संधीचा फायदाहि घेतला. अशा घराण्यांत सखपाळ, खराडे, गुजर, आंग्रे इत्यादिकांचा प्रामुख्याने उल्लेख करण्यांत येतो. त्यांतल्या त्यांत आंग्रे घराण्याची कामगिरी महाराष्ट्राच्या इतिहासांत चिरस्मरणीय राहणारी आहे.

तुकोजी आंग्रे व त्याचा मुलगा कान्होजी, ही बापलेकांची शूर जोडी मराठ्यांच्या आरमारावर नोकरीस होती. तुकोजीच्या मृत्यूनंतर या कामाची सर्व जबाबदारी कान्होजीने आपल्याकडे घेतली व ती अत्यंत कौशल्याने पार पाडली. संभाजीमहाराजांच्या अमानुष वधानंतर स्वराज्यांत बऱ्याच भानगडी व बखेडे उत्पन्न झाले. राज्याची विस्कटलेली घडी नीट करण्यांत राजाराममहाराज व इतर बडे सरदार गुंतले होते. अशा स्थितींत कोंकणासारख्या बाजूच्या प्रदेशाकडे कोण लक्ष देणार ? मुसलमान मिळतील तो प्रांत घेत होते. कुलाबा आणि खांदेरी या ठिकाणीं छत्रपतींच्या तर्फे कान्होजी व भिवजी गुजर हे अंमल करीत होते. आरमाराची पूर्वींची शिस्त राहिली नव्हती. कान्होजीने या परिस्थितीचा फायदा घेतला व आरमार आपल्या ताब्यांत घेऊन तो स्वतंत्ररीत्या वागूं लागला.

कान्होजीच्या तीन बायका व कांहीं रखेल्या होत्या. पैकी ज्येष्ठ स्त्री मथुराबाई, हिला सखोजी व संभाजी असे दोन पुत्र होते. दुसरी पत्नी लक्ष्मीबाई, ही मानाजी जगताप यांची कन्या, हिला संतान नव्हतें. तिसरी गहिनाबाई; हिला तुळाजी, मानाजी, येसाजी व धोंडजी असे चार पुत्र होते.

प्रस्तुतच्या चरित्राची नायिका **लक्ष्मीबाई** व तिची वडील सवत मथुराबाई या एकमेकींशीं फार प्रेमाने वागत. घरांतील सर्व मुलांना लक्ष्मीबाईबद्दल

जितका आपलेपणा वाटे तितका आपल्या आईबद्दल वाटत नसे. ह्या मुलांचें गृहशिक्षण लक्ष्मीबाईच्या करड्या नजरेखाली झालेलें असल्यामुळें आपल्या घराण्यांतील लौकिकाला साजतील अशींच कृत्यें त्या मुलांच्या हातून झालीं. या मुलांनी आपल्या वाडवडिलांप्रमाणे नाविकविद्येंत पूर्ण कौशल्य मिळवावें या उद्देशाने लहानपणापासूनच त्या मुलांना जहाजावरून समुद्रांत नेण्यांत येई व हें काम लक्ष्मीबाई स्वतः करीत असे. कित्येकदा तर ती दिवसांचे दिवस मुलांना घेऊन समुद्रावर राहात असे. मुलांच्या मातांना – मथुराबाई व गहिनाबाई यांना – ही गोष्ट तितकीशी पसंत पडत नसे. पण करतात काय बिचाऱ्या! एक तर लक्ष्मीबाईबरोबर जाण्यासाठी मुलेंच हट्ट धरून बसत व दुसरी गोष्ट म्हणजे खुद्द कान्होजी आंग्रे लक्ष्मीबाईला या बाबतींत नेहमी उत्तेजन देई. मथुराबाई व गहिनाबाई यांनी कितीहि तक्रारी केल्या तरी त्याचा कांही उपयोग होत नसे.

या सुमारास कान्होजी हा अरबी समुद्राचा जणू मालकच बनला होता. “ त्रावणकोरपासून मुंबईपावेतो एकंदर किनाऱ्यावर कान्होजीची छाप होती. ” ( मराठी रियासत, सरदेसाई. ) त्याला मुख्य शत्रु असे तीन. इंग्रज, फिरंगी, मुसलमान, विशेषतः गोऱ्या साहेबांना कान्होजीचें समुद्रावरील वर्चस्व सहन होईना. प्रत्येकजण आपापल्यापरी त्याचा मोड करावा या इच्छेने जय्यत तयारी करीत होता. १७१५ सालचा प्रसंग अशाच तऱ्हेचा होता. मुंबईला इंग्रजलोकांचा बून या नांवाचा गव्हर्नर होता. तो कान्होजीच्या नांवाने फारच जळफळत असे. “ पश्चिम किनाऱ्यावर अनिरुद्ध संचाराला अडथळा करील त्याची मी खोडकीच जिरवणार, ” ( मराठी रियासत ) असा ठाम निश्चय करून त्याने स्वारीची जाम तयारी केली. अभेद्य अशीं जहाजें तयार करून त्यांना **‘चपल’** **‘विजय’** इत्यादि अभिमानास्पद नांवें दिलीं. जहाजांवर १४८ तोफा व साडेबारारों नाविक लढवय्ये. समुद्रांतून व जमिनीवरून अशा दोहों दिशांनी कान्होजीचा कोंडमारा करावा असा बूनसाहेबांचा बेत! इंग्रजी व गांवटी मिळून चार हजार सैन्य

भूमिमार्गाने निघालें. जहाजांचा तांडा मोठ्या डौलाने निशाण फडकावीत पाण्यावर चालूं लागला. ठरल्याप्रमाणे दोन्ही दिशांनी कान्होजीवर हल्ला चढला. पण काळपुरुष कान्होजी निधड्या छातीने शत्रूला तोंड देण्यास तयार होता. लढाई जुंपली. कान्होजी निकराने लढत होता. बूनसाहेबाला " आकाशांतील बापा " चा " बून " ( आशीर्वाद ) नव्हता म्हणा किंवा कान्होजीचा पराक्रम प्रखर होता म्हणा, रियासतकार रा. सरदेसाई म्हणतात, त्याप्रमाणे मुठींत नाक घेऊन बिचाऱ्या बूनसाहेबाला माघार घ्यावी लागली. या चकमकींत इंग्रजांचे दोनशें लोक मेले व तीनशें जखमी झाले. कान्होजी जिवंत असेपर्यंत फिरंगी, डच, इंग्रज इत्यादि टोपीकारांना पश्चिम समुद्रावर स्वतंत्रपणे फिरकतां आलें नाही. उलट स्वतःच्या संरक्षणासाठी व आपल्या जहाजांना जातां येतां अडथळा होऊं नये म्हणून हे लोक कान्होजीला ठराविक रकमा देत. व आपलीं जहाजें नीट राखण्यासाठी यांना लाखों रुपये खर्च करावे लागत.

कान्होजीच्या या धाडसी वर्तनामुळेच मराठ्यांचें वर्चस्व पश्चिम किनाऱ्यावर टिकून राहिलें. शाहूमहाराज छत्रपति झाल्यावर त्यांनी कान्होजीचा मोठा सन्मान करून त्याला ' सरखेल ' हें मोठ्या मानाचें पद अर्पण केलें. पण शाहूमहाराज व कान्होजी यांचें विशेष पटत नसे. नेहमी पैशाबाबत कांही ना कांही कटकट चाले. असा हा दर्यावर्दी कर्तबगार कान्होजी १७२९ सालीं मरण पावला व स्वराज्याचा एक आधारस्तंभ नाहीसा झाला.

कान्होजीच्या पराक्रमी यशाचें श्रेय अनल्पांशाने त्याच्या स्त्रियांनाहि द्यावें लागतें. कान्होजी समुद्रावर आपल्या उद्योगांत गुंतला असतांना घरचा सर्व कारभार मथुराबाई व लक्ष्मीबाईच पाहात असत. शाहूमहाराजांच्या कारकीर्दींत ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर म्हणून एक साधुपुरुष फार प्रसिद्धीस आले होते. ते राजकारणांत पुष्कळ ढवळाढवळ करीत. कान्होजी आंग्र्यावर यांची फार मर्जी होती. मथुराबाई तर स्वामीमहाराजांच्या आज्ञेशिवाय कांही

महत्त्वाचें काम करीत नसे. लक्ष्मीबाईची या साधूवर तेवढीशी निष्ठा नव्हती. ती जात्याच करारी, निश्चयी असल्यामुळे घरच्याघरीं बसून राहणें तिला आवडत नसे. ती पुष्कळदां गलबतांतून समुद्रावर लूट मिळविण्यासाठी व मुलें नाविक विद्येंत प्रवीण व्हावीं म्हणून त्यांना घेऊन जात असे याचा उल्लेख वर आलाच आहे. असें सांगतात कीं तिच्या गलबतावरील तांडेल वगैरेचीं सर्व कामें स्त्रियाच करीत असत. लक्ष्मीबाईच्या या धाडसी पराक्रमाविषयी पुढील एक आख्यायिका ऐकण्यांत आहे.

कान्होजीवरील सूड उगविण्यासाठी निदान लक्ष्मीबाईला पकडावें या इच्छेने शत्रू नेहमी टपलेले असत. परंतु ही हुषार स्त्री त्यांच्या तावडींत केव्हाहि मिळाली नाही. शत्रूचें जहाज जवळपास दिसतांच ती नेहमी दोन हात करण्यास तयार असे. तिचें जहाज शस्त्रास्त्रें व दारूगोळा यांनी सुसज्ज असे. कित्येक प्रसंगीं शत्रूला पळून जाणें भाग पडे; व पुष्कळदा शत्रूचीं जहाजें लुटून ती चपळाईने कुलाब्यास परत येई. कान्होजी तिच्या या साहसाबद्दल तिची फार फार वाहवा करी. कुलाब्यानजीकच्या सर्व खाड्या, त्यांतील चोरवाटा, माऱ्याचीं व संरक्षणाचीं ठिकाणें यांची तिला खडान्खडा माहिती होती. एकदा अशाच एका प्रसंगीं तिच्या जिवावर येऊन बेतलें होतें. शत्रु येऊन अंगाशीं भिडले. पळून जाण्याला तर मार्गच नव्हता. नाइलाज झाला; पण शूर लक्ष्मी भ्याली नाही, गडबडली नाही. तिचें दुर्दम धैर्य, यशस्वी प्रसंगावधान तिच्या मदतीला धांवून आलें. तिने आकाशाकडे दृष्टि लावली. क्षणभर विचार केला. पळाचा विलंब न लावतां जहाजावरील दारूच्या भांडाराला आग लावली व पाण्यांत उडी मारण्याची सर्व स्त्रियांना आज्ञा केली. पहिली उडी लक्ष्मीबाईची! धाड्, धाड्, धाड्! एकामागून एक सर्व स्त्रिया पाण्यांत पोहत निघाल्या. शत्रु तर आश्चर्याने स्तंभितच झाले. लक्ष्मीबाई आपल्या सख्यांसह तीराला येऊन सुरक्षित पोंचली!

आख्यायिका या दृष्टीने जरी ह्या गोष्टीकडे पाहिलें तरी लक्ष्मीबाई मोठ्या खंबीर मनाची व निश्चयी बाण्याची होती, हें ऐतिहासिक पत्रव्यवहारावरून सिद्ध होतें.

सन १७२९ सालीं कान्होजी मरण पावला व 'सरखेली'चीं वस्त्रें त्याचा वडील पुत्र सेखोजी यास देण्यांत आलीं. सेखोजीचें आरमारी शिक्षण लक्ष्मीबाईच्या दूरदृष्टी धोरणाखालीं झालें होतें.

बाल्यापासूनच समुद्रावरील जीवन अंगवळणीं पडल्यामुळे सेखोजी हा उत्तमांपैकी असा नाविक लढवय्या झाला होता. रा. सरदेसाई 'पेशवा दप्तरांतील निवडक पत्रव्यवहार' भाग ३ या पुस्तकांत म्हणतात, "Sekhoji was a brave and circumspect naval commander." सेखोजी शूर व सर्वतोपरी दूरदर्शित्वाने वागणारा नाविक वीर होता.

सेखोजीवर लक्ष्मीबाईचें पुत्रवत् प्रेम असल्यामुळे तिचा उपदेशाचा फायदा सेखोजीस फार झाला असला पाहिजे. त्या वेळीं आंग्रे–बाजीराव यांमध्ये पत्रव्यवहार झाला आहे त्यांत लक्ष्मीबाईचीं कित्येक पत्रें आपणांस पाहावयास मिळतात.

त्या काळचा मुख्य प्रश्न जंजिरा येथील सिद्दीचा होता. टोपीकर या सिद्दीला आंतून मदत करीत होते. सिद्दी ताब्यांत आल्याशिवाय पश्चिमकिनारा मराठ्यांच्या हातीं निर्भेळपणे येत नव्हता. सिद्दीवरील मोहिमेंत श्रीपतराव प्रतिनिधि, फत्तेसिंग भोसले, उदाजी पवार, पिलाजी जाधव हे प्रामुख्याने भाग घेत होते. स्वारीची संपूर्ण जबाबदारी आंग्र्यांवर होती. लक्ष्मीबाईने या प्रकरणांत पुष्कळच मन घातलें होतें. तत्संबंधीं बाजीरावाशीं तिचा बराच पत्रव्यवहार होई. शाहूमहाराज व बाजीराव तिची योग्यता जाणून होते. ही स्वारी ऐन रंगांत आली असतां रंगभंग करण्याचें दैवाने ठरविलें.

ता. २५–८–१७३३ च्या पत्रांत सेखोजी बाजीरावास लिहितो, "आजि नव रोज शरीरी आनारोग्यता जाली आहे. तीन दिवस ज्वरातिशय होऊन त्या उष्णतेमुळे रुधिरश्राव नासिकद्वारें होऊं लागला, उपाय करणें तो करीत आहों." अशा स्थितींत अधिक दिवस गेले नाहींत. ता. २८–८–१७३३ रोजीं कान्होजी मरण पावला. लक्ष्मीबाईवर आकाश कोसळलें! पण ती धैर्यवती स्त्री! तिने स्वारीच्या कामांत तिळभर अंतर पडूं दिलें नाही. सेखोजीच्या मृत्यूची बातमी बाजीरावास कळविली. पेशव्यांकडून सांत्वनपर उत्तर आलें. त्याला उत्तर म्हणून लक्ष्मीबाईने लिहिलेल्या पत्रांत पुढील वाक्यें आहेत. (पेशवे–दप्तर, भाग ३, पत्र नं. ८६, ता. ३–९–१७३३).

"चिरंजिवांनी परमपद्वास केल्यानुअन्वयें समाधानविषयी लेख लिहिला. लोकांचीं समाधानें करावीं इत्यादिक लिहून पाठविलें. अशास होणार प्रसंग, ज्या समयीं तें होतच आहे. त्या गोष्टीचा खेद अवलंबून सिद्धि काय? दुःखाचें परिमार्जन करून पूर्वीपासून लौकिक संपादिला आहे, त्याचें संरक्षण करावें, हाच स्वधर्म आहे. यास्तव पुत्रशोकाचें दुःख अपहारून तमाम किल्लो-किल्ला व मुलुखामध्यें जागजागा जमाव आहेत. त्यास समाधानपत्रें पाठवून आवघियाचें मनोधारण केलें असें. आपण चिंता न करावी."

एकंदरींत ही लढाई बराच वेळ चालण्यास लक्ष्मीबाईची बरीच मदत कारणीभूत झाली आहे. पुढे सेखोजीच्या मृत्यूनंतर आंग्रे घराण्यांत बरीच यादवी माजली व त्यामुळे लक्ष्मीबाईला मोठ्या राजकारणांत लक्ष घालतां आलें नाही!

अशा रणशूर, धाडसी, स्वार्थत्यागी स्त्रिया स्वराज्यांतच कां निर्माण झाल्या याची मीमांसा वाचकवर्गावर सोपविणें योग्य होईल.

# ६. राधाबाई पेशवे

बुद्धीच्या हिरकणीला स्वराज्याचें कोंदण आवश्यक असतें. बुद्धीची वाढ स्वातंत्र्यक्षेत्रांत जितक्या जोराने फोंफावते, तितक्याच प्रमाणांत इतर स्थितींत तिचा अंकुर मुळांतच खुरटतो. स्वराज्य चालविणारी महाविभूति ही लोह-चुंबकासारखी असते. बुद्धिमत्तेच्या लोहाला ती आपल्याकडे जिकडूनतिकडून आकर्षून घेते. महाराष्ट्रांतील स्वराज्याच्या उत्कर्षकालांत अशीच परिस्थिति निर्माण झाली. आपलें नशीब पारखावें म्हणून किती तरी बुद्धिमान् नररत्नांनी कोकणप्रांतांतून घाटमाथ्याचा मार्ग पत्करला. श्रीवर्धनाचा बाळाजी विश्वनाथ भट हाहि याच उद्देशाने स्वराज्याच्या राजधानीकडे वळला व अनुकूल परिस्थितीचा योग्य फायदा घेऊन देशमुखीवरून पेशवाईच्या पदापर्यंत चढला.

भट घराण्याकडे श्रीवर्धन परगण्याची देशमुखी होती. तो प्रदेश हब-शांच्या अधिकारांतील. कांहींशा क्षुल्लक कारणावरून मालकाची मर्जी या घराण्यावरून उडाली व भटघराण्याला अत्यंत वाईट स्थिति प्राप्त झाली. बाळाजीचा वडील भाऊ जानोजी याला शत्रूने गोणपाटांत बांधून समुद्रांत बुडवून मारलें. देशत्यागाशिवाय दुसरा मार्ग उरला नव्हता. बाळाजीचे दुसरे बंधु आपल्या बायकामुलांना घेऊन कोकणांतच दुसरीकडे गेले. परंतु बाळाजीला भावी राजयोग होता. आपण देशावर मराठ्यांच्या राज्यांतच जावें, असा सुविचार सुचून तो घाटावर आला.

कोकणांत असतांनाच बाळाजीचें प्रथम लग्न झालें होतें. परंतु द्वितीय विवाहाचें कारण कांही समजत नाही. देशावर आल्यानंतर त्याने नेवाशाच्या ( डुबरेकर ) बर्वे–घराण्यांतील मुलीशीं द्वितीय विवाह केला. या विवाहाला वीस

रुपये खर्च आला (लोकहितवादी–ऐतिहासिक गोष्टी). हीच **राधाबाई** ह्या चरित्राची नायिका होय. हिला लिहितां वाचतां येत असे. ती फार हुशार व दूरदर्शी होती. पेशव्यांच्या घराण्यांतील तीन पिढ्यांपर्यंत तिने राजकारण करून इतिहासांत नांव चिरस्मरणीय केलें.

पेशवे घराण्यांत ज्या स्त्रिया झाल्या, त्यांत राधाबाईइतकी व्यवहारकुशल व धोरणी बाई दुसरी झाली नाही. बाळाजी ज्या परिस्थितींतून आपल्या प्रयत्नाने डोकें वर काढीत होता, त्या परिस्थितीच्या नुसत्या विचारानेच साधासुधा माणूस डगमगला असता. परंतु आपल्या उद्योगांत वाटत असलेला आत्मविश्वास व राधाबाईसारखा चतुर सहधर्मचारिणीचें प्रोत्साहन, या गोष्टींत बाळाजीचें यश सामावलें आहे. राधाबाई ही पतीच्या मार्गावरची धोंड तर नव्हतीच, पण पतीच्या उत्कर्षपथावर आडवी येणारी धोंड बाजूला सारून त्याचा मार्ग सुगम करणारी धीरोदात्त महिला होती.

पति, पुत्र व नातू अशा तीन पिढ्यांपर्यंत स्वराज्यांतील राजकारण जिने आपल्या बुद्धिप्रभावाने गाजविलें व प्रतिकूल स्थितीला धडाडीने तोंड देऊन प्रत्येक बाबतींत तें यशस्वी करून दाखविलें अशा महाभाग महिलेची गणना असामान्य कोटींत होणार नाही का?

बाळाजीने प्रथम पंतसचीवांकडे नोकरी पत्करली. पुढे तो सेनापति धनाजी जाधव यांजकडे राहिला. याच सुमारास औरंगजेबाने शाहूला कैदेंतून सोडून दक्षिणेकडे पाठविलें. दक्षिणेंत आल्यावर शाहूला धैर्यगलित करणारी प्रतिपक्षीय व्यक्ति कोण असेल तर महत्त्वाकांक्षी मुत्सद्दी ताराबाई ही होय. तिने इतर सरदारां-प्रमाणे धनाजी जाधवालाहि आपल्याकडे येण्याचा आग्रह केला व धनाजी तिची विनंती मान्य करण्याच्या बेतांत होता. पण बाळाजी अत्यंत दूरदर्शी होता. त्याने सर्व परिस्थितीचा लक्षपूर्वक अभ्यास केलेला. 'अविचार्य यत्कृतम्' ही गोष्ट

त्याच्या हातून केव्हाहि घडलेली नव्हती. तो हात जोडून धन्यासमोर उभा राहिला; सर्व स्थितीचा चित्रपट धनाजीसमोर त्याने रेखाटला. परिणाम असा झाला, कीं धनाजीने ताराबाईची विनंती अमान्य केली व तो शाहूला येऊन मिळाला. इथूनच बाळाजीच्या बुद्धिदीपाचा प्रकाश स्वराज्याच्या यादवींत तळपूं लागला. धनाजीसारखा असामान्य योद्धा आपणांला मिळाला, यामुळे शाहूला अत्यंत आनंद झाला व त्याने धनाजीला आपला सेनापति केलें. धन्याच्या आज्ञेवरून बाळाजीने वसुलातीच्या कामाला आरंभ केला. त्याने आपलें काम इतक्या चोख रीतीने बजाविलें कीं धनाजीच्या मृत्यूनंतर शाहूने त्याची नेमणूक त्याच कामावर केली. या एवढ्या उलाढालींत बाळाजीला स्वाभाविकच पुष्कळ शत्रु निर्माण झाले. त्यांत ज्यांची नोकरी त्याने सोडली ते पंतसचिव व त्याच्या उदार मालकाचा – धनाजी जाधवाचा – मुलगा चंद्रसेन यांचा उल्लेख प्रामुख्याने होतो.

बाळाजीला राधाबाईच्या पोटीं चार अपत्यें झालीं. दोन मुलगे व दोन मुली. पैकीं रामलक्ष्मणाप्रमाणे शोभणाऱ्या बाजी–चिमाजींचीं नांवें महाराष्ट्रीयांच्या मनांतून केव्हाहि पुसलीं जाणार नाहीत. " या पराक्रमी बंधुद्वयांत दिसून येणारें अन्योन्य प्रेम कचित्‌च दुसरीकडे दिसून येतें. " [ सरदेसाई–पेशवेदप्तर. ] बाजीरावाच्या जन्माची हकीकत रा. बापट यांनी आपल्या कादंबरीवजा **बाजी-राव–चरित्रांत** दिली आहे. बाळाजीपंताने राधाबाईस एक दिवस विचारलें कीं " आतांशा तूं अशी कोमेजलेली कां दिसतेस ? तुला काय झालेंबिलें तर नाही ना ? तुला का कोणी रागें भरलें, का कोणी तुझें ऐकिलें नाही ? काय असेल तें सांग. सांगितल्याशिवाय लोकांनी काय समजावें ? आता तुला सहावा सरून सातवा महिना लागला. त्यांत तूं पहिलटकरीण. एकदा हातीं पायीं सुटका झाली म्हणजे मी निसूर झालों. तुला हवें असेल तें माग, संकोच धरूं नको, मन खुलें करून बोल. " हें ऐकून राधाबाईने संकोचवृत्तीने सलज्ज उत्तर दिलें, " माझ्या मनांत बाई, आतांशा भलभलतेंच येतें. असें वाटतें कीं, आपल्या घरीं घोडीं

बाळगावीं, वसंतपूजा करून ब्राह्मणांस दक्षिणा वाटाव्या, वेदशास्त्रांच्या घरीं शाळा ठेवाव्या, आपले मराठे गडी रावबा व भिवबा यांना कडीं–पागोटीं द्यावीं, गांवांतून मुसलमान घालवून द्यावे. ”

“ डोहाळ्यांवरून मुलाची परीक्षा होते अशी म्हण आहे. ती खरी असल्यास चिन्हें तर बरीं दिसतात. ईश्वरेच्छा असेल तसें घडेल. ” असा विचार करून बाळाजी उगाच राहिला. पूर्ण मास भरल्यावर राधाबाई प्रसूत झाली व मुलगा झाला. प्रसूतीच्या वेळीं वाटणारा मनःक्षोभ निवारण करावा म्हणून बाळाजी जुन्या बखरी वाचीत बसला. त्यांत पूर्वीं होऊन गेलेल्या ‘ बाजी ’चींच चरित्रें होतीं, म्हणून मुलास **बाजीराव** हें नांव ठेविलें.

स्वराज्यासारखा स्वातंत्र्याचा काळ, बाळाजीसारखा चतुरस्त्र व तैलबुद्धि जनक, व राधाबाईसारखी चतुर व प्रेमळ माता—या त्रिवेणी संगमांत लहानपणीं मुलाच्या मनावर किती तेजस्वी संस्कार झाले असतील ! बाळाजी राजकारणांत गुंतलेला, त्यामुळे मुलांच्या गृहशिक्षणाची सर्व जबाबदारी राधाबाईवरच होती. लहान मुलांचीं मनें स्वातंत्र्योन्मुख करण्याचें तिचें कौशल्य अजब होतें. या स्वातंत्र्यप्रेमाच्या भूमिकेची मशागत करण्याचें काम तिने आपल्या नातवंडांपर्यंत केल्यामुळे बाजीरावासारखा अद्वितीय योद्धा चिमाजीसारखा प्रशांत मुत्सद्दी, नानासाहेबासारखा राजकार्यधुरंधर नेता, सदाशिवभाऊसारखा अप्रतिम बुद्धीचा कलमबहाद्दर, रघुनाथरावासारखा अटकेपार भगवा झेंडा मिरवीत नेणारा रणधुरंधर, असे अनेक क्षेत्रांत अखंड कीर्ति करून ठेवणारे **महापुरुष** स्वराज्याच्या इतिहासांत चमकत आहेत.

बाजी–चिमाजीची जोडगोळी लहानपणांत फारच हूडपणाने वागे. स्नानसंध्या, नमस्कार–दंड, लेखन–वाचन हे दैनिक कार्यक्रम झाले म्हणजे खेळखंडोबा, दांडगाई, कलागति याशिवाय त्या दोघांना दुसरें कांही सुचत

नसे. प्रेमळ राधाबाई त्यांना योग्य शिस्तींत ठेवी, पण त्यांच्या साहसी वृत्तीच्या आड ती केव्हांहि आली नाही. पुढे मुलें मोठीं झाल्यावर बाळाजी त्यांना आपल्याबरोबर नेऊं लागला. राधाबाईला किती आनंद झाला ! आपलीं लहान चिमणीं अर्भकें मुलखगिरीवर कशीं पाठवूं हा विचार त्या वीरमातेच्या मनास शिवला नाही. उलट लहानपणापासून टक्केटोणपे खाल्ल्याशिवाय व बाह्य जीवनाचा अनुभव स्वतः अनुभविल्याविना मुलें हुशार होत नाहीत, असेंच ती वरचेवर बोलून दाखवी व ही गोष्ट अगदी खरी आहे.

या धाडसी व साहसी आयुष्यांत त्या मुलांवर अनेक जिवावरचे प्रसंग आले. त्यांपैकी पुढील प्रसंग राधाबाईच्या वीरवृत्तीवर प्रकाश पाडणारा असल्यामुळे देत आहें. वर उल्लेख आला आहे कीं बाळाजीच्या प्रति-स्पर्ध्यांत धनाजीचा मुलगा चंद्रसेन जाधव हा होता. धनाजीनंतर तो सेनापति झाला. बाळाजीचा अधिकार शाहूने स्वतंत्र केल्यामुळे व शाहू त्याची सल्लामसलत अनेक कामीं घेऊं लागल्यामुळे चंद्रसेन बाळाजीचा उघडउघड द्वेष करूं लागला. पुढे एकदा बाळाजी व चंद्रसेन या उभयतांना एकाच प्रांतांत जाण्याचा योगायोग आला. दोघांचे डेरे निराळे असत. एके दिवशीं दोघांच्या शिपायांमध्ये थोडी बाचाबाची झाली व या सबबीचा फायदा घेऊन चंद्रसेनाने बाळाजीच्या डेऱ्यावर हल्ला केला. परंतु बाळाजी मोठा प्रसंगावधानी माणूस. त्यांतल्या त्यांत कांही शिताफी करून दोन्ही मुलांस घेऊन चंद्रसेनाचा हल्ला येण्याच्या अगोदरच तो शाहूकडे निघून आला. यानंतर चंद्रसेन उघडपणें ताराबाईच्या पक्षास मिळाला व त्याने शाहूचे बरेच सरदार फोडले. शाहूच्या तोंडचें पाणी पळालें. पण बाळाजीच्या बुद्धीवर व पराक्रमावर त्याची दांडगी श्रद्धा. बाळाजीने नितान्त परिश्रम करून सैन्य उभारलें व प्रथम तो दमाजी थोरातावर चालून गेला. दमाजीने तहाचें बोलणें लावलें व विश्वास-

घात करून बाळाजी बेसावध असतां त्याच्या कुटुम्बियांसह त्याला कैद करून किल्ल्यावर ठेवून दिलें. बायकामुलांचे होत असलेले हाल बाळाजीला पहावेतना! त्यानें दमाजीशीं बोलणें लावलें कीं, 'माझी सुटका कर, मी तुला वाटेल ती खंडणी देतों.' दमाजी पैशांच्या अडचणींत होताच. त्याला ही गोष्ट पटली. पण बायको, मुलांस ओलीस ठेवून बाळाजीने जावें अशी त्याने अट घातली. बाळाजी मोठ्या विचारांत पडला.

विचारान्तीं ही अट आपण केव्हाहि मान्य करणार नाही असा निरोप दमाजीला तो पाठवणार, इतक्यांत राधाबाई पुढे येऊन म्हणाली, "रक्कम मिळो अथवा न मिळो, आम्हांस ओलीस ठेवून दमाजी आपली सुटका करीत असेल तर तुम्ही जा. आमची काळजी करूं नका. प्रथम महाराजांस भेटा, त्यांनी रक्कम दिली तर आमची सुटका होईलच, नाही तर दमाजी आम्हांला ठार मारील, इतकेंच ना? पण दमाजीचा सूड घेण्याकरिता तुम्ही मोकळे राहालच की!"

पण हा प्रसंग येण्यापूर्वीच शाहूला ही बातमी कळली व त्याने त्या सर्वांची मुक्तता केली. हळूहळू बंडखोर सरदारांचा मोड झाला व बाळाजीच्या पराक्रमाचें सार्थक म्हणून कीं काय त्याला १७१३ सालीं पेशवाईपद देण्यांत आलें. पेशवा या नात्याने त्याने बजावलेली स्वराज्यांतील कर्तबगारी सर्वश्रुत आहे. पेशवाईची स्थापना करणारा हा पहिला पेशवा इ. स. १७२० सालीं स्वर्गवासी झाला.

राधाबाईला पतिनिधनाचें दुःख किती झालें याची कल्पनाच केलेली बरी! परंतु दुःख करीत बसण्याची ती वेळ नव्हती, हें त्या चतुर स्त्रीच्या ध्यानांत यावयास अवकाश लागला नाही. तिच्या बुद्धीच्या कसोटीचा तो प्रसंग होता. पतीच्या मागे आपल्या बाजीरावास पेशवाईपद मिळण्याच्या मार्गांत अडचणींच्या मोठाल्या शिळा तिच्या मनःचक्षूंसमोर उभ्या राहिल्या.

तिने आपलें सर्व दुःख धैर्यानें गिळलें आणि पतीचे और्ध्वदेहिक संस्कार संपतांच बाजीरावास साताऱ्याला शाहूकडे पाठवून दिलें.

राधाबाईच्या मनांत आलेल्या सर्व अडचणी खऱ्या होत्या. बाळाजीच्या मृत्यूची संधि साधून बाजीराव तर कोवळा पोर आहे या सबबीवर प्रतिनिधि इत्यादि बाळाजीशीं वितुष्ट असणारे सरदार शाहूच्या मनांत भलतेंच भरवून देत होते. परंतु शाहू गुणग्राही होता. त्यानें आपल्या सरदारांचें म्हणणें धाब्यावर बसविलें, व बाजीरावास पेशवाईचीं वस्त्रें अर्पण केलीं. आपली युक्ति सफल झालेली पाहून राधाबाईच्या आनंदास सीमा उरली नाही. पण या आनंदांत गर्क होऊन ती राहिली नाहीं. तिला पक्कें ठाऊक होतें कीं, बाजीराव हा शिपाई गडी या नात्यानें कोणालाही हार जाणार नाही. पण राजकारणांतील मुत्सद्देगिरी त्याच्याठायीं त्याच्या वडिलांइतकी नव्हती. रा. सरदेसाई म्हणतात कीं, "बाजीराव तर आडदांड शिपाई. त्याचें घरगुती कारभारांत मुळीच लक्ष नव्हतें. हा सर्व कारभार राधाबाई व चिमाजीच पहात." शाहूचें मन कोणी चिथावूं नये, या दूरदृष्टीनेंच चिमाजी अप्पा आईच्या सांगण्यावरून शाहूपाशींच राहूं लागला.

घरांतील कारभार सर्वस्वी राधाबाईच्या हातीं होता ही गोष्ट वर आलीच आहे. कौटुंबिक व सामाजिक बाबतींत ती पूर्ण मुखत्यारीनें वागे. सुनांमुलींवर तिची मोठी जरब असे. इतकेंच काय, पुढे पुढे पेशवे स्वारीवर गेले म्हणजे पुण्यांतील कारभारांत राधाबाईच्या आज्ञेशिवाय पान हालत नसे. या तिच्या कार्यांत तिला चिमाजीची अत्यंत मदत होई. चिमाजी बाजीरावापेक्षा दहा वर्षांनी लहान; पण तो अत्यंत विचारी, मनमिळाऊ व धोरणी असल्यामुळे बाजीरावाचें राजकारण उभें राहिलें. "बाजीरावाच्या पराक्रमापुढे त्याचें तेज पडलें नाही, तरी दरबारांत अगर रणांगणांत तो बाजीरावापेक्षा तिळमात्र कमी दर्जाचा नव्हता. शूर वीर, मुत्सद्दी सेनापति त्याचप्रमाणे अलौकिक चातुर्य, या गुणत्रयीवर त्यानें शाहूचें मन अंकित केलें होतें" (सरदेसाई पेशवेदप्तरप्रस्तावना.) बाजीरावाच्या

पत्नीचें नांव काशीबाई. ही अगदी साधी व गरीब स्वभावाची होती. बाजीरावासारख्या हडेलहप्पी शिपाईबहादुराला आपल्या ताब्यांत ठेवण्याचें सामर्थ्य तिच्या अंगीं नव्हतें. याचमुळे बाजीराव मस्तानीसारख्या यवनीच्या आहारीं पडला. बाजीरावास बाळाजी तथा नानासाहेब, रघुनाथराव व जनार्दन, असे तीन पुत्र. पैकी जनार्दन हा लहानपणींच वारला.

बाजीरावाने मराठी राज्याचा विस्तार कसा व किती वाढविला हें इतिहास सांगत आहे. त्याच्या हाताखाली अनेक महाराष्ट्रीय घराणीं उदयास आलीं. ग्वाल्हेर, इन्दूर, बडोदें इत्यादि संस्थानांचे मूळ पुरुष बाजीरावाच्या खांद्यास खांदा लावून लढले होते. शिंदे, होळकर, गायकवाड, पवार, दाभाडे, मेहेंदळे, बुंदेले, घोरपडे इत्यादि नामवंत सरदार बाजीरावाचे हस्तक होते. इतर अनेक सरदारांनी आपणांस रहाण्यासाठी वाडे बांधले. आपणहि एक बांधावा अशी इच्छा होऊन सन १७३१ सालीं बाजीरावाने पुण्यास **शनवार वाडा** बांधला. साहजिकच राज्यकारभाराची जागा सातार्‍याहून पुण्यास आली.

मध्यवयानंतर बाजीरावास मस्तानी नांवाच्या सुंदर स्त्रीचा नाद लागला. बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल याने उपकार-फेडीसाठी बाजीरावास आपल्या राज्याचा एकतृतीयांश भाग, अत्यंत मौल्यवान जडजवाहीर व त्याबरोबरच मस्तानी ही सुंदर युवती, अशा देणग्या दिल्याची आख्यायिका आहे. परंतु मस्तानी मूळची कुठली व ती बाजीरावाकडे कशी आली या बाबतींत अजून ऐतिहासिक पुरावा खात्रीलायक बाहेर आलेला नाही. या बाईने पेशव्यांच्या कुटुंबावर कांही काळ औदासिन्याची दाट छाया पसरविली होती यांत शंका नाही. बाजीरावाचा मुलगा नानासाहेब हा आता कांही लहान नव्हता. राधाबाई, चिमाजी व नानासाहेब यांनी बाजीरावाचा हा नाद सुटावा म्हणून जंग जंग पछाडलें. परंतु बाजीराव मस्तानीच्या पूर्ण आहारीं पडला होता. इतकेंच नव्हे तर अभक्ष्यभक्षण, अपेयपान इत्यादींचे त्याचे निर्बंध सुटून तो आप्ताच्या

दा. क्र. १५९३४

भाषेत म्हणावयाचें म्हणजे पूर्ण सुधारक बनले. त्या वेळेच्या परिस्थितीप्रमाणे ही गोष्ट अत्यंत लज्जास्पद, कुलाला कलंक लावणारी होती. राधाबाई धीराची बायको, पण तिचा सुद्धा धीर खचला. पुढे पुढे बाजीराव राज्यकारभारांतहि लक्ष घालीना. मस्तानीशिवाय त्याला क्षणभर चैन पडेना. चिमाजी आपल्या पत्रांत नानास लिहितात,

" वाटेस घोड्यावर बसोन राऊ चालत होते. तेव्हा येके गावचा पाटील भेटीस आला, तेव्हा असावध होते. त्यामुळे पाटलासी सहजात बोलले, जें कोंबड्याचे प्रयोजन आहे तें घेऊन येणें. हे विचार मस्तानीजवळून निर्माण जाले असत. ती पीडा जाईल तेव्हा पुण्यच प्राप्त होईल, न होई ऐसे दिसत नाही."

राधाबाईने या बाबतींत चिमाजीला पाठविलेलें पत्र पुढीलप्रमाणे आहे—

श्री.

चिरंजीव राजमान्य राजश्री आप्पा याप्रती राधाबाई आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे. विशेष, चिरंजीव राजश्रीराव याजपासी बहुत युक्तीच्या विचारे जो विचार करणे तो करून येणें. चालीवर नजर देऊन जें कर्तव्य तें करावें. बहुत काय लिहिणें हे आसीर्वाद.

' पुढे पेशव्यांचे घरीं मुलांच्या मुंजी निघाल्या. त्या वेळची एक गोष्ट सांगतात की मस्तानीनेहि आपला मुलगा समशेर याची मुंज करा असा हट्ट घेतला. बाजीरावाला तिला 'नाही' म्हणतां येईना. त्याने याविषयी चिमाजीकडे निरोप पाठविला. राधाबाई तर मनस्वी संतापली व बाजीरावाला ऐकू जाईल अशा आवाजांत उद्गारली, " चिमाजी, ठीक आहे. अक्षत घेऊन साताऱ्यास छत्रपतीकडे जा आणि मुंजीचें आमंत्रण दे; आणि माझा

निरोप सांग की, आपल्या पेशव्यांना यवनीच्या पोटीं झालेल्या मुलाची मुंज आहे, आपण या अपूर्व समारंभास मुद्दाम पुण्यास यावें."

हें प्रकरण धसास न लावतां बाजीराव तितक्यांत स्वारीचें निमित्त करून उत्तरेंत निघून गेला व हा प्रसंग टळला.

चिमाजी अप्पांचें मातृप्रेम अलौकिक होतें. आपल्या प्रेमळ आईला त्या सत्पुरुषाने कसलाहि त्रास दिला नाही. उलट आईचा शब्द म्हणजे ईश्वरी आज्ञा, या भावनेने तो वागे. राधाबाईने समुद्रस्नानाची इच्छा प्रदर्शित केल्याबरोबर कोंकणांत असतांना त्याने नानास पत्र लिहिलें—"मातुश्रीबाई समुद्रस्नान करणें आहे म्हणून पावसाला बोलली होती. यावेसें असेल तर रवानगी करणें. सौभाग्यवती मातुश्री काशीबाई वहिनींचा पाय बरा जाला असला आणि त्यांच्या विचारें समुद्रस्नानास यावेसें असलें तर त्यांसहि रवाना करणें. ती आली म्हणजे जनार्दन, रघुनाथ, सदाशिव त्रिवर्गहि येतील. जर त्यांच्या पायाचें दुःख बरें झालें नसलें आणि त्यांच्या विचारें तूर्त यावेसें नसलें तर त्यांचें राहाणें होईल. त्यांचें राहाणें झालें तर जनार्दन त्यांजवळ राहील. रघुनाथ, सदाशिव यांस मातुश्री समागमें पाठवणें. मातुश्रींच्याहि विचारें तूर्त यावेसें नसलें तर कोणासहि पाठवावयाचें प्रयोजन नाही. हे आशीर्वाद."

हें पत्र म्हणजे नम्रता, विनय, वडील मंडळींविषयी आदर इत्यादि सद्गुणांचा आदर्श आहे. यानंतर सन १७३५ सालीं राधाबाई काशी यात्रेस निघाली. हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व क्षेत्रें ती फिरली होती. काशीयात्रेस जातांना सदाशिवरावास तो वयाने लहान असूनहि तिने बरोबर घेतलें होतें. यात्रेस निघतांना फारच धांदल झाली. व चिमजी आप्पास नीटसा निरोप घेण्यास अवधि राहिला नाही, त्याबद्दल त्याला अत्यंत वाईट वाटलें व त्याने राधाबाईस पत्र लिहिलें—

"आपण तुमचा निरोप घेतला ते समई आपण पाय उतारा तुमचे समागमे घटकाभर येऊन मग निरोप घेऊन यावें असें होतें, परंतु ते समयीं चित्तांत आलें नाही यामुळे चित्तांत आलीकडे आलियावर हळहळ वाटली. आपलें समाधानपूर्वक आशीर्वाद पत्र आलें म्हणजे चित्तांतील हळहळ दूर होईल हे विनंती." किती अगाध मातृप्रेम हें! यात्रा करीत राधाबाई उदेपुरास पोंचली. राणोजीने राधाबाईचा सन्मान उत्तम प्रकारें केला. "महालांत मातोश्रीस नेली. राणोजी मातोश्रीचे दर्शनास महालांत गेले. मोत्यांची माळ १, पदक १ व हातचे सोन्याचे चुडे, हत्ती छावा, १५,००० रुपये खर्चास, बिहारीदास (उदेपुरचा प्रधान) यांनीं १००० एक हजार नजर केली."

अशा मानसन्मानाने यात्रा करून राधाबाई सन १७३६ च्या एप्रिल महिन्यांत परत आली. राधाबाईने धर्मकृत्येंहि अनेक केलीं. मुलांचें संगोपन, शिक्षण यांवर तर तिचा विशेष कटाक्ष असे. शिवाय व्रतवैकल्यें देवदेवतार्चन, संतर्पण, विहिरी, पूल इत्यादि प्रवासाला उपयोगी सोयी करणें या गोष्टींकडे ती जात्या लक्ष पुरवी. घरांतील लग्नकार्यांत–मग लग्न मुलींचें असो अगर मुलांचें असो–तिचाच शब्द प्रमाण मानला जात असे. या बाबतींत तिची व्यवहारकुशलता स्पष्टपणें दृष्टीस पडते. जास्तींत जास्ती श्रीमंत व्याही मिळवायचे हेतु हा कीं, अडीअडचणींत त्यांचा उपयोग करून घ्यावयाचा. असा एंकदर कारभार चालला असतां बाजीराव इ. स. १७४० मध्यें उत्तरेंत जंगी मोहीम करण्याच्या तयारीत असतां नर्मदातीरीं मरण पावला. व लवकरच चिमणाजी आप्पाहि स्वर्गवासी झाले.

× × ×

कर्त्यासवर्त्या दोन पुत्रांच्या मरणाचें दुःख राधाबाईसारख्या प्रेमळ मातेच्या मनास सहन करणें अशक्य होतें. दुःखाचा उमडा येई पण ती तो विषासारखा घोटी. कर्तव्यकर्म काय याजकडे तिने लक्ष दिलें.

बाजीरावाला पेशवाईपद मिळतांना ज्या अडचणी आल्या त्याच आता परत दत्त म्हणून उभ्या होत्या. तशा अडचणींची पुनरावृत्ति होऊं नये म्हणून तिने पूर्वीपासूनच काळजी घेतली होती. ती नाना, रघुनाथ, सदाशिव यांस वरचेवर सातार्‍यास शाहूकडे पाठवी, कां कीं महाराजांना त्या मुलांचा लळा लागावा, पण बाजीराव मृत्यु पावला त्या वेळीं शाहूच्या वाड्यांत राघोजी भोसल्याचें प्रस्थ बरेंच वाढलें होतें. त्याने पेशवाईपद नानाला मिळूं नये म्हणून शिकस्तीचे प्रयत्न केले. परंतु त्या प्रयत्नांचा कांहीं उपयोग झाला नाही व शाहूने नानासाहेबास पेशवाईचीं वस्त्रें दिलीं.

हें सर्व होईपर्यंत राधाबाईच्या जिवांत जीव नव्हता. नानाला पेशवाईचीं वस्त्रें मिळाल्याचें ऐकून तिने समाधानाचा सुस्कारा सोडला व आपल्या नेहमीच्या व्यवसायांत ती रमून गेली. तिच्याच आग्रहावरून नानासाहेबाने पर्वतीवर मंदिरें बांधलीं, त्याशिवाय दानधर्म, ब्राह्मणभोजनें चालतच असत.

मृत्युसमयीं बाजीरावास भयंकरच कर्ज होतें. तें फेडणें हें नानासाहेबांचें प्रथम कर्तव्य होतें. त्याने उत्तरेंत स्वारी करण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणे सर्व सिद्धता झाली. बाजीराव–मस्तानी–प्रकरणामुळे राधाबाईचें मन आधीच हळुवार झालें होतें. नानासाहेब अशा कोणत्याहि पाशांत मिळूं नये म्हणून नानाची स्त्री गोपिकाबाई हिने स्वारीबरोबर जावें असें तिने ठरविलें. आतांपर्यंत स्वारींत कबिले [ कुटुंब ] नेण्याची मनाई असे. नानासाहेबांनी सुरवात केल्यानंतर कोणी यात्रेसाठी, कोणी कशासाठी म्हणून आपापलीं कुटुंबें स्वारीबरोबर नेऊं लागले. याचा

अनिष्ट परिणाम शेवटी पानिपतच्या लढाईत मराठ्यांस भोवल्याशिवाय राहिला नाही.

राधाबाईंची जरब आजूबाजूच्या परिस्थितीवर व लोकांवर किती होती हें पुढील गोष्टीवरून सिद्ध होतें.

पुण्यांत गोविंद हरी पटवर्धन यांच्या घरीं एक स्पृश्यास्पृश्यांचें प्रकरण निघालें. पटवर्धनांकडे पुष्कळ बटीकी होत्या. त्यांपैकी एक महार जातीची आहे असें समजून आलें. पटवर्धनांवर गहजबच होता तो! वाचकांनी तो काळ ध्यानांत आणावा, म्हणजे पटवर्धनांची इतकी घाबरगुंडी कां उडाली हें समजेल. पटवर्धन घराण्यावर भटांभिक्षुकांनी बहिष्कार पुकारिला. राधाबाईंनी जर या प्रकरणांत लक्ष घातलें नसतें तर पटवर्धन घराण्याला 'दे माय धरणी ठाय' झालें असतें. राधाबाईने सर्व ब्राह्मणांना एकत्र बोलाविलें.

ब्राह्मणांवर तिचें वजन दांडगें होतें. तिच्या विरुद्ध जाणें म्हणजे काय गोष्ट आहे, हें पोटार्थी ब्राह्मणहि जाणून होते. तिने मोठ्या चतुराईने ब्राह्मणांची समजूत घातली व त्यांच्याचकडून शास्त्रार्थ काढविला. प्रायश्चित्त घेऊन पटवर्धन सहकुटुम्ब या प्रसंगांतून राधाबाईच्या कृपेने बाहेर पडले.

आता राधाबाईचा वृद्धापकाळ आला. १७५१ सालीं नानासाहेबांनी आजीची रुपयांनी तुळा केली. देवतार्चनांत व दानधर्मांत राधाबाई आपलें आयुष्य घालवूं लागली व अशा स्थितींतच तारीख १९-४-१७५३ रोजीं तिने आपली इहलोकींची यात्रा संपविली.

# ७. गोपिकाबाई

बाजीराव मृत्यु पावल्यानंतर पेशवाईच्या पदासाटी थोडा वेळ बराच घोटाळा शाहूच्या दरबारांत माजला. परंतु राधाबाई पेशवे हिच्या चरित्रांत लिहिल्याप्रमाणे शेवटी बाजीरावाचा मुलगा बाळाजी [ नानासाहेब ] यांसच शाहूने पेशवेपदावर स्थापिलें. नानासाहेब, रघुनाथराव, चिमाजीअप्पाचा मुलगा सदाशिवराव या सर्वांचें गृहशिक्षण राधाबाईच्या अनुभवी व करड्या नजरेखाली झालें होतें. त्या शिक्षणाचा फायदा या सर्व मुलांस मोठेपणीं फार झाला हें त्यांच्या चरित्रांच्या परिशीलनाने आपणांस समजून येईल. नानासाहेबांवर तर लहानपणींच महत्त्वाचीं कार्यें करण्याची जबाबदारी पडत गेल्यामुळे तो लेखणी व तरवार, या दोन्हीं विद्यांत पारंगत झाला होता.

नानासाहेबांचें लग्न त्यांच्या वयाच्या दहाव्या वर्षी भिकाजी नाईक रास्ते यांची कन्या गोपिकाबाई इच्याशीं झालें. लग्नानंतर नऊ वर्षांनी गोपिकाबाईला ऋतुप्राप्ति झाली व ही बातमी ता. १८–१–१७४० ला नानासाहेबांस स्वारीवर असतांना कळली. यावरून लग्नाच्या वेळीं गोपिकाबाईचें वय अवघें पांचसहा वर्षांचें असावें असें वाटतें. नानासाहेबांची आजी राधाबाई हीच घरांत सर्वाधिकारत्वाने वागत असल्यामुळे सर्व मुलीबाळी, लेकीसुना तिला बिचकून वागत. ती तशीच धोरणी व मुत्सद्दी असल्यामुळे पेशव्यांच्या घरांतील कारभार सुतासारखा सरळ चालत असे. ती जिवंत असेपर्यंत घरांतील कोणत्याहि स्त्रीला राजकारणांत तोंड घालणें, अगर घरगुती कामांत आपल्या मताने वागणें

शक्य नव्हतें. जावा जावा आपआपसांत फार कुजबुजत, पण आजेसासूपुढे ब्र काढण्याचें एकीलाहि सामर्थ्य नव्हतें.

राधाबाई इ. स. १७५३ त वारली. तिच्या पश्चात् घरांतील वडीलकीचा मान साहजिकच गोपिकाबाईकडे आला. परंतु राधाबाईची दूरदृष्टि, समंजस वागणूक, निःपक्षपातीपणा इत्यादि अलौकिक गुण गोपिकाबाईच्या अंगीं नव्हते, सगळ्या बायका प्रथम राधाबाईच्या अमलाखाली होत्या, त्यांत गोपिकाबाईहि होती; तेव्हा आपल्यांतीलच एक बाई आता आपल्यावर अधिकार गाजवणार याबद्दल इतरांना असूया वाटणें मनुष्यस्वभावाला अनुसरून होतें. त्यामुळे गोपिकाबाईला आपला प्रपंचगाडा सरळ हाकतां आला नाही. मात्र तिच्या मानी, करारी व मत्सरी स्वभावामुळे गृहकलहाला भयंकर ऊत येऊन त्याची झळ पेशव्यांच्या राजकारणापर्यंत जाऊन पोचली व मधून मधून मोठमोठ्या महत्त्वाच्या कामांचाहि विचका झाला.

गोपिकाबाईच्या चरित्राचे व कामगिरीचे तीन भाग पाडतां येतील पहिला राधाबाईच्या मृत्यूपर्यंतचा कालखंड, दुसरा नानासाहेबांच्या मृत्यूपर्यंत. या काळांत तिने आपली सत्ता गाजविण्याचा, राजकारणांत भाग घेण्याचा व नानासाहेबांस आपल्या अंकित ठेवण्याचा अविश्रांत प्रयत्न केला. या प्रयत्नाला यावें तेवढें यश आलें नाही, तें कां, हें वाचकांस यथावकाश समजेलच. तिच्या आयुष्यांतील तिसरा कालखंड म्हणजे तिचा मुलगा माधवराव हा पेशवाईवर आल्यापासून तिच्या मृत्यूपर्यंतचा होय. यांपैकी तिची सर्व चरित्रकथा दुसऱ्या खंडांत प्रामुख्याने येते. राधाबाईच्या अधिकारामुळे गोपिकाबाईच्या चरित्रांतील पहिला कालखंड जसा निष्क्रिय होता तसाच माधवरावाच्या तेजस्वीपणामुळे तिच्या चरित्रांतील तिसऱ्या कालखंडांतहि तिच्या हातून कांही होऊं शकलें

नाही. गोपिकाबाईच्या चरित्रांत प्रामुख्याने दोन गोष्टी इतिहास-वाचकांच्या नजरेस पडतील. एक पेशव्यांच्या घरांतील गृहकलह व त्यांत गोपिकाबाईने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष घेतलेला भाग; आणि दुसरी गोष्ट म्हणजे नानासाहेबाला आपल्या मुठींत ठेवण्याचा गोपिकाबाईने केलेला प्रयत्न.

बाजीराव-मस्तानी प्रकरणाने पेशव्यांच्या घरांतील सर्वांचीं अन्तःकरणं भाजून गेलीं होतीं. राधाबाईसारख्या प्रेमळ मातेला, चिमाजीसारख्या सत्त्वसंपन्न सद्‌बंधूला, शाहूमहाराजासारख्या थोर मनाच्या राजर्षीला, इतकेंच नव्हे तर नानासाहेबासारख्या कोमल मनाच्या अर्भकाला बाजीरावाच्या या नादान वर्तनाने असह्य दुःख झालें होतें. या प्रकरणाची पुनरावृत्ति होऊं नये म्हणून राधाबाई अत्यन्त जागरूकतेने पुढच्या पिढीकडे लक्ष देऊं लागली. व अशा वर्तनाला योग्य उपाय म्हणून की काय, नानासाहेबांना प्रत्येक स्वारींत आपली स्त्री गोपिकाबाई हीस बरोबर घेऊन जाणें भाग पडे. या चालीने महाराष्ट्रांत मराठा समाजांत क्रांतिकारक परिणाम घडवून आणले. या घातुक चालीचा एकच दुष्परिणाम सांगावयाचा म्हणजे शिपाईगिरीला कमीपणा आणणारीं लाजिरवाणी स्त्रैणकृत्यें सैन्याच्या छावणींत वेळोवेळीं होऊं लागलीं.

नानासाहेब पेशवा झाला त्यावेळीं त्याच्यासमोर दोन कार्यें प्रामुख्याने उभीं होतीं. शाहूमहाराजांच्या इच्छेप्रमाणे '**हिंदुपद्पाद्शाही**' स्थापन करणें, व याहून कठीणतर म्हणजे बाजीरावाने डोक्यावर लादून ठेवलेला पर्वतप्राय कर्जाचा भार हलका करणे. राजधानींत बसून हीं दोन्ही कामें सिद्ध होणें अशक्य होतें. यास्तव शक्य तितक्या लवकर घरच्या कार्याची व्यवस्था लावून स्वारीवर जाण्याशिवाय त्याला गत्यंतर नव्हतें.

१७४१ सालीं नानासाहेबांनी हिंदुस्थानांत जंगी तयारीने स्वारी केली. पहिल्या कांही मुक्कामांत गोपिकाबाई बरोबर होती. खानदेशांत आल्यावर तिला दिवस गेल्याचें दिसून आलें. नानासाहेबांनी सदाशिवरावाबरोबर तिला

पुण्यास पाठवून दिली. ती योग्य वेळीं प्रसूत होऊन मुलगा झाला. तोच विश्वासराव–पेशवाईतील अमोलिक रत्न, मदनाचा अवतार होय.

पेशव्यांच्या गृहकलहास अनेक कारणें देतां येतील. या गृहकलहाची जबाबदारी पुष्कळ प्रमाणांत गोपिकाबाईसारख्या पेशव्यांच्या स्त्रियांवर लादण्यांत येते परंतु या कलहाग्नींत तेल ओतून थोड्या प्रमाणांत कां होईना पण, आपला स्वार्थ साधूं इच्छिणारे आजूबाजूचे कांही नामांकित सरदार या बाबतींत दोषी ठरतात, ही गोष्ट आपण विसरतां कामा नये. गोपिकाबाई तर बोलून चालून स्त्री, त्यांत तिला धोरण कमी. अशा परिस्थितींत पेशव्यांच्या सरदारांपैकी कांही व्यक्तींनी नानासाहेबांविरुद्ध कांही केलें असें कळल्याबरोबर गोष्ट खरी आहे की खोटी आहे याचा शहानिशा न करतां ती आवल्या नवऱ्याजवळ कांही बोलत असल्यास त्यांत विशेष वावगें होतें असें म्हणतां येत नाही. परिस्थितिच अत्यंत चमत्कारिक होती. जुने भोसल्यासारखे सरदार उघड उघड पेशव्यांच्या विरुद्ध होते. हे लोक आपणाला मदत करणार नाहीत म्हणून शिंदे, होळकर इत्यादि नवे सरदार निर्माण करणें पेशव्यांना भाग पडलें. अर्थात् प्रत्येक नवीन सरदाराला राजकारणांत आपला हात असावा असें वाटत असे. व त्या दृष्टीने प्रयत्न झाले म्हणजे लुडबुड्या माणसांकडून ते पेशव्यांच्या कानापर्यंत पोंचत असत.

या सर्व प्रकरणाला खरा रंग चढला तो इतिहासांत ज्याला ‘ सांगोलें प्रकरण ’ म्हणतात त्या गोष्टीने. ( या प्रकरणाचा समग्र इतिहास या चरित्रांत विषयान्तरामुळे देतां येत नाही. ज्यांना कुतूहल वाटत असेल त्यांनी ‘ मराठी रियासत, मध्य विभाग २ ’ या श्री. सरदेसाई यांच्या पुस्तकांत विसाव्या प्रकरणांत पहावा. )

प्रसंगीं सदाशिवरावांनी कांही राजकीय दृष्ट्या अत्यन्त महत्त्वाच्या

गोष्टी नानासाहेबांचा विचार न घेतां आपल्याच मुखत्यारीने केल्या. असें करण्यांत त्या वेळचें एक बडें प्रस्थ, रामचंद्रबाबा ह्या व्यक्तीचें सदाशिवरावांस प्रोत्साहन मिळालें.

रामचंद्रबाबा मूळचे कोकणचे. आपल्या जन्मजात हुशारीने व मुत्सद्देगिरीने दरबारांत त्यांनी आपलें वजन बरेंच वाढविलें होतें. नानासाहेब, सदाशिवराव वगैरेंचें लहानपणचें शिक्षणहि यांच्याच हाताखाली झालें होतें. कांही दिवस ते शिंद्यांचा कारभार पाहण्यासाठी उत्तरेंत राहिले. परंतु राजकारणाचा डाव म्हणून नानासाहेबांनी त्यांना पुण्यास आणलें. मोठ्या उद्योगाने बाबांनी अलोट संपत्ति मिळविली होती. या दृष्टीने नानासाहेब व सदाशिवराव या दोघांसहि ते पाहिजे होते. परंतु आपलें महत्त्व पेशवाईंत असावें ही बाबांची फार इच्छा म्हणून सदाशिवरावास हाताशीं धरून, त्याला लागेल तो पैसा देऊन ते राजकारणाचे डाव खेळूं लागले. पुढे छत्रपतींची पेशवाई स्वतःकडे घेण्याची इच्छा सदाशिवरावांस झाली. कोल्हापूरकरांकडूनहि सदाशिवरावांस पेशवेपद स्वीकारण्याबद्दल पत्रें येऊं लागलीं. अशा रीतीने रामलक्ष्मणाप्रमाणे एकमेकांवर अगाध प्रेम करणाऱ्या बंधूंत वैमनस्याचा प्रसंग ओढवला! या सर्वांच्या बुडाशीं रामचंद्रबाबा, महादोबा पुरंदरे वगैरे बडी बडी मंडळीं होती. या प्रकरणीं अजून पाहिजे तेवढा पुरावा उपलब्ध झालेला नाही. तरी ह्या सर्व बातम्या गोपिकाबाईच्या मार्फत नानासाहेबांकडे जात. याचा परिणाम एवढाच झाला कीं पेशवे बंधूंच्या मनांत संशयपिशाच्चाने जें ठाणें दिलें तें जवळजवळ कायम टिकलें. पुढें सर्व खऱ्या गोष्टी उघडकीस आल्या. नानासाहेब व सदाशिवराव एकोप्याने वागूं लागले पण त्यांत पूर्वीची मजा नव्हती. याशिवाय असे अनेक प्रसंग निर्माण झाले कीं ज्यामुळे गोपिकाबाई नानासाहेबांचें मन कलुषित करते, हा प्रवाद इतिहासांत कायम स्वरूपाचा झाला.

यापुढील प्रसंग म्हणजे पानपतच्या लढाईचा.

" दत्ताजी शिंदे पडले. गिलच्यांचा जोर फार आहे. सारें हिंदुस्थान एकवटलें आहे. मराठी राज्याची धडगत दिसत नाही " इत्यादि मजकुराचें पत्र जनकोजी शिंद्याकडून पेशव्यांकडे आलें. कोणीतरी खास हिंदुस्थानांत स्वारीवर गेल्याशिवाय निभाव लागणार नव्हता. नानासाहेबांनी गोपिकाबाईचा विचार घेतला. " दादासाहेबांना पाठवावें " असा तिने सल्ला दिला. भवितव्यता बलवत्तर !

नानासाहेबांना हें पटलें नाही. परंतु दादासाहेबांनी जाण्याचा आग्रह धरिला. ८० हजार स्वारांची नालबंदी व एक कोट खजिना इतक्या रकमेची त्यांनी मागणी केली. सदाशिवभाऊस दादासाहेबांची मागणी मान्य नव्हती. त्यांनी स्वतः जाण्याचें ठरविलें. नानासाहेबांनी त्यांची अनेक प्रकारें समजूत घालण्याचा प्रयत्न केला; परंतु सदाशिवरावांचा [ भाऊसाहेबांचा ] स्वभाव जात्याच हट्टी. नानासाहेबांनी त्यांना गोपिकाबाईचा विचार घेण्यासाठी पाठविलें. गोपिकाबाईसाहेब जवळच तंबूच्या पलीकडच्या दालनांत होत्या. भाऊसाहेबांनी नमस्कार करून सव मजकूर निवेदन केला. गोपिकाबाईनी पुष्कळ विनविलें. शेवटी अशी विनवणी केली कीं, " भाऊसाहेब, आम्हांस ओलांडून जाऊं नये. " तेव्हां भाऊसाहेब विषादान येऊन म्हणाले, " तुम्ही जातीच्या स्त्रिया. तुम्हांस राजकारणांत विचारावें हेंच वेडेपण आहे. तुम्हांस हा मनसुबा कशास पाहिजे ? " हे शब्द ऐकून गोपिकाबाईस अत्यत दुःख झालें. परंतु भाऊसाहेबांचा निश्चय पुरतेपणीं कळला तेव्हा ती थोरणी बायको म्हणाली, " आमचें बायकांचें जिणें व्यर्थ आहे. आम्हांस विचारावें आणि मग असें झिडकारावें, हेंच देवाने बायकांच्या कपाळीं लिहिलें आहे. असो. आता तुम्ही रहात नाही. तरी विश्वासरावावर तुमचें प्रेम आहे व बाईचीहि त्याजवर माया आहे बरोबर मुलास घेऊन जावें म्हणजे

आमची आठवण राहील. ” [ दुर्दैवी रंगू–पान ७५–७६ ] या प्रकरणाचा शेवट काय झाला हें महाराष्ट्रास माहीत आहेच.

पेशव्यांच्या गृहकलहांतील अनेक महत्त्वाच्या प्रसंगांपैकीं मुख्य असे दोन आतापर्यंत दिले. वाचकांनी न्यायाधिशाची वृत्ति पत्करून गोपिकाबाईच्या वांट्यास दोषाचें किती माप येतें तें ठरवावें.

यानंतर गोपिकाबाईचा दुसरा जो मोठा उद्योग म्हणजे नानासाहेबाला आपल्या कह्यांत ठेवणें यासंबंधी माहिती पुढे देत आहें. बाजीराव–मस्तानी–प्रकरण नानासाहेबाला आवडत नसे याबद्दलची माहिती या व ‘ राधाबाई पेशवे ’ इच्या चरित्रांत आलीच आहे. परंतु उत्तर हिंदुस्थानांत गेल्यावर मुसलमान बादशहांचें ऐश्वर्य पाहून म्हणा, किंवा इतर कांही कारणें झालीं म्हणा, पण नानासाहेबाला शृंगाररसाची चटक लागली. इतकेंच नव्हे तर दिवसेंदिवस ती वाढत गेली असें म्हणण्यास पुष्कळ आधार आहे.

“ दोन पोरी, खुबसुरत, दहा दहा वर्षांच्या हिंदू शुद्ध, जरूर खरेदी करून पाठवाव्या ” [ पत्र ता. ११–६–१७४३ ] याशिवाय ( खं. ३ लेखांक १५६. ) सन १७५५ मधील एका पत्रांत खालील मजकूर आहे, “ श्रीमंत स्वामीची फर्मासी दिल्लीहून आणिली. चार हजार रुपये खर्च केले. पांच पोरी उत्तम आणविल्या. त्यांत दोनतीन जे स्वामीचे खुशीस येईल ते देऊं. तलास बहुत केला. ” यावरून गोपिकाबाई स्वारींत असणें एका अर्थी नानासाहेबांच्या पथ्यावर पडत असे, कां कीं, आपल्या स्त्रैणत्वाचा बभ्रा होऊं नये असाहि आपल्या तरुण वयकोस बरोबर घेण्यांत त्यांचा हेतु असावा. ( मराठी रियासत मध्यविभाग २–सरदेसाई. )

नानासाहेबांच्या या रंगेलपणाचें वर्णन श्री. वैद्य यांनीं आपल्या ‘ दुर्दैवी रंगू ’ या कादंबरींत बहारीचें केलें आहे. तें सारांश–रूपाने खाली देत आहें :—

'रंगूची दुष्टांच्या हातून गोपिकाबाईंनी सुटका केली. रंगूला पकडण्याच्या बाबतींत आपल्या पतीचें मुळीच अंग नाही, हें समजल्यापासून गोपिकाबाईंना पराकाष्ठेचा आनंद झाला होता. रंगपंचमीचा दिवस. गोपिकाबाईला भेटण्यासाठी नानासाहेब मंदिरांत आले. त्यांना रंगूची हकीकत समजतांच फार वाईट वाटलें. गोपिकाबाईने हात जोडले व आपल्या नवऱ्याकडे भीतीने व प्रेमाने पाहिलें. 'महाराज, मला क्षमा करा, आपण सार्वभौम राजे आहां, माझें तर परम दैवत आहां, आमचे सर्वांचे राजे आहां, माझे जीवप्राण आपले आहेत. मी मूर्खहि आहें. मी आपल्यास काय सांगावें? पण माझें कुंकू मला बोलवीत आहे.' असें म्हणून, गोपिकाबाई रडूं लागल्या. 'महाराज, परस्त्रीचा नाद मोठा वाईट आहे. या नादापासून आयुष्याची हानि होते, असं शास्त्रांत सांगितलं आहे'. नानासाहेबानी त्या गुणखनी भार्येचें भाषण ऐकलें व त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. त्यांनी प्रेमाच्या भरांत आपल्या प्रियपत्नीस हृदयाशीं गाढ धरलें. तिच्या पाठीवर हात फिरवून म्हटलें, 'परमेश्वराने मला सर्व प्रकारचें वैभव दिलें, राज्य दिलें, ऐश्वर्य दिलें; पण या वैभवापेक्षा उदार, सद्गुणी, सुरूप, सन्मार्ग दाखविणारी आणि मजवर अत्यंत प्रेम करणारी स्त्री दिली, हें भाग्य सर्व भाग्याहून श्रेष्ठ आहे. अशा सद्गुणी स्त्रीचें मी आजवर चीज करावें तसें केलें नाही. खरोखर मी अपराधी आहें. माझा अपराध क्षमा कर. यापुढे त्या कलावंतिणींचा संबंध तोडून टाकतों. मग तर झालें ना?' तेव्हा गोपिकाबाई म्हणाल्या, 'मी मर्यादा सोडून बोललें हाच माझा खरोखर अपराध आहे. असं कोण चाण्डाळीण म्हणेल कीं, आपण दासी ठेवूं नका! महाराज, आपल्या वैभवाला, आपल्या सार्वभौम-ऐश्वर्याला, कलावंतिणी पाहिजेत व त्या शोभतात.'

कादंबरीकाराची कल्पना वजा करितां आपणांस एवढें दिसेल की त्या

वेळच्या नीतिनियमांप्रमाणे कलावंतिणी पदरीं ठेवणें विशेष गर्हणीय समजलें जात नसे. असें जरी होतें तरी श्री. वैद्य म्हणतात. त्याप्रमाणे हें सार्वजनिक व्यसन नानासाहेबांच्या अगदी आटोक्यांत होतें. गोपिकाबाईवर त्यांचें प्रेम होतें; पण शेवटी काय झालें कोणास ठाऊक! तिकडे पानिपतचा घोर प्रसंग चालला होता; कदाचित् गोपिकाबाईच्या ढवळाढवळीने त्यांचें मन उद्विग्न झालें असावें. कारण ता. २७ डिसेंबर १७६० रोजीं नानासाहेबांनी दुसरें लग्न केलें. तीन मुलगे जिवंत, पहिली पत्नी नेहमी बरोबर असें असतां नानासाहेबांनी लग्न करावें यावरून त्यांचें व गोपिकाबाईचें तितकेंसें पटत नव्हतें असें वाटतें. ही दुसरी पत्नी पैठणच्या नारोबा नाईक वाखरे या देशस्थ सावकाराची मुलगी होती. देशस्थ-चित्पावन-भेद नानासाहेब पाळत नव्हते, एवढें यावरून स्पष्ट होतें. [ सरदेसाईकृत नानासाहेब पेशवे. ]

अशा परिस्थितींत पानिपतची हृदयविदारक बातमी आली. "दोन मोर्ती गलत, दस वीस आश्रफत, रुपयोंको गणति नही." ही सांकेतिक भाषेंत लिहिलेली सावकारी बातमी नानासाहेबांच्या कानावर पडली. नानासाहेबांचें हृदय विदीर्ण झालें. अनावर शोक झाला. भ्रमिष्टासारखी स्थिति झाली. गोपिकाबाई बरोबर होतीच. नानासाहेबांना घेऊन परत फिरण्याचा तिने निश्चय केला. ते सगळ्यांवर रागावूं लागले. गोपिकाबाई त्यांना नजरेसमोर नकोशा झाल्या होत्या. नानांच्या आत्मवृत्तान्तांत याबद्दल पुढील उद्गार आहेत. 'परंतु ईश्वर कृपेने व त्यांचे आशीर्वादाने महत्संकटांतून पार पडलों. पुढे श्रीमंत नानासाहेब यांचें दर्शन बराणपुरास झालें. पहातां तों शरीर फार क्षीण जहालें आहे. मर्जी बेतऱ्हा झाली आहे. बहुतांच्या अश्रु क्षणक्षणां जात. परंतु मजवर सदयतेनें लोभें करून भाषण करून वर्तमान पुशिलें. सांगितलें. तीन चार दिवस बरोबर राहिलों. श्रीमंत गोपिकाबाई व नारायणराव यांस देवी आल्या. करितां सहवर्तमान नर्मदातीरीं राहिलों. परस्परें [ नानासाहेब व गोपिकाबाई

यांचें ] उभयतांचें चित्तहि ठीक नाहीं हें कळलें.' [ काव्येतिहाससंग्रहः — नानाचें स्वलिखित आत्मवृत्त ]

अशा परिस्थितींत दिवसेंदिवस नानासाहेबांचा भ्रम वाढत चालला. स्मरण राहीनासें झालें. मुक्काम करीत करीत ६ जून रोजीं मंडळी पुण्यास पोचली. प्रकृति क्षीण होत चालली. ता. १८ रोजीं नानासाहेब पर्वतीवर जाऊन राहिले. बुद्धिभ्रंश वाढत चालला. भाऊ, भाऊ, असा शोक करीत व सर्वांचें अंतःकरण विदीर्ण करीत मंगळवार ज्येष्ठ वद्य ६ शके १६८३ [ ता. २३–६–१७६१ ] रोजीं नानासाहेबांनीं इहलोकची यात्रा वयाच्या अवघ्या चाळिसाव्या वर्षी संपविली.

यानंतर गोपिकाबाईच्या चरित्रांतील तिसऱ्या भागाला सुरुवात होते. नानासाहेबांच्या मृत्यूनंतर माधवरावास हातार्शी धरून रघुनाथराव राज्यकारभार करूं लागले. गोपिकाबाईचें रघुनाथरावांपुढे कांहीं चालेना. घरगुती भांडणाला ऊत आला. माधवराव, रघुनाथराव, गोपिकाबाई, सखारामबापू आपापल्या रीतीने स्वतःचें महत्त्व वाढविण्याचा प्रयत्न करीत असत. गोपिकाबाई हुषार परंतु मनस्वी होती. पहिल्या प्रथम राधाबाई-मुळें तिला कांहीं करतां आलें नाहीं. नानासाहेबांनी आपल्या हयातींत तिचा हट्ट चालू दिला नाहीं. यापुढे तर आपला मुलगा माधवराव यास हातार्शी धरून राज्यकारभार स्वतः चालविण्याची तिची इच्छा अनावर झाली. परंतु माधवराव बुद्धिमान्, मानी, तेजस्वी व निर्भीड वृत्तीचा होता. एक–दोन वर्षांच्या आंतच तो स्वतःच्या जबाबदारीवर सर्व कारभार पाहूं लागला. माधव-रावाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असा आपल्या आईचा अपमान केव्हाहि केला नाही. परंतु आपला मुलगा राजकारणांत आपल्या मताला विशेष किंमत देत नाही असें तिला दिसून आल्याबरोबर, तिनें पुणें सोडलें व सन १७६४ सालीं ती नाशकाजवळ गंगापुरास जाऊन राहिली. या ठिकाणीं सुद्धा माधवरावाने तिची

व्यवस्था फारच उत्तम ठेविली होती. अठरा हजार रुपये खर्च करून तिच्यासाठी एक वाडा बांधला होता व तिच्या खर्चास बारा हजार रुपयांची सालिना नेमणूक केली होती. राजकारणविषयक बातम्या तो तिला वारंवार कळवी. राजकारणाशिवाय इतर गोष्टींत माधवराव आईच्या शब्दाच्या बाहेर गेला नाही. दुसऱ्या कोणास आपल्या खाजगी बातम्या कळूं नयेत म्हणून माधवराव गोपिकाबाईंना महत्त्वाचीं पत्रें बालबोधींत लिही. कारण तिला मोडी वाचतां येत नसे. रघुनाथराव, नाना फडणीस वगैरे मंडळींनीं तिला पुणाला परत आणण्याची बरीच खटपट केली, पण तिने आपला हट्ट सोडला नाही.

माधवराव पेशव्यास राज्यासाठी अतोनात उद्योग करावा लागला. त्याचा परिणाम त्याच्या शरीरावर होऊन, त्याला अल्पवयांतच राजयक्ष्मा जडला. कर्नाटकचे स्वारींत असतांना सन १७७० च्या एप्रिल महिन्यांत माधवरावांची प्रकृति बिघडली. ती परत सुधारली नाही. सन १७७१च्या एप्रिल महिन्यांत गोपिकाबाई माधवरावास भेटण्यास आली असा उल्लेख आहे. [खरे—ले. ११३५

१७७२ सालीं माधवरावांची प्रकृति चिंताजनक झाली. इकडे गंगापुरास गोपिकाबाईहि बऱ्याच आजारी पडल्या. अशक्तपणामुळे माधवरावाची इच्छा असतांहि तिला भेटण्यास जातां आलें नाही. इतक्या दुखण्यांत गोपिकाबाईनी काशीयात्रेची पण तयारी चालविली होती. त्यासाठी रघुनाथरावदादा मुद्दाम गंगापुरास आले व प्रकृति नीट झाल्याशिवाय काशीयात्रेस जाऊं नये अशी त्यांनी गोपिकाबाईंना विनंती केली. अशा गोंधळलेल्या परिस्थितींत माधवरावांचा आजार वाढत जाऊन, बुधवार कार्तिक वद्य ८ स दोन घटका दिवस असतां 'गजानन' 'गजानन' म्हणत मोठ्या योग्याप्रमाणे नेत्रद्वारें त्यांचा प्राण गेला. रमाबाई सती गेली. ( मराठी रियासत–सरदेसाई. ) या प्रसंगाने गोपिकाबाईच्या मनाला जबरदस्त धक्का बसला व तिची उदासीन वृत्ति अधिकच वाढली. यापुढील तिच्या आयुष्यांतील भयंकर प्रसंग म्हणजे ता. ३० ऑगस्ट सन १७७२ रोजीं

झालेला तिच्या मुलाचा–नारायणराव पेशवे याचा–खून. ही हकीकत इतिहास वाचकांस माहीत आहेच. मृत्यूपूर्वीच कांहीं दिवस नारायणराव आईला भेटण्या-साठी गंगापुरास गेला होता. मातुश्री बोलली कीं, 'वडिलांपाठीमागे कांहीं कीर्ति कराल, कीं, चुलत्यामागे पोट भरून राहाल?' ते शब्द मनांत धरून पुण्यास आले, तों हा प्रसंग नशिबीं लिहिला होता.

या वज्राघाताने गोपिकाबाईचें हृदय दुभंगून गेलें. तिने सर्वसंग परित्याग करून गंगापूर सोडलें व पंचवटींत एका मठांत मुक्काम केला. चार घरीं भिक्षा व पोट भरावें. काय बिचारीची स्थिति! रायाची कान्ता असून भीग मागणें नशिबीं आलें!

पुढे बारभाईचें कारस्थान होऊन सवाई माधवरावाच्या नांवानें राज्य-कारभार चालू लागला. यामुळे तिला थोडेसें समाधान वाटलें व ती गंगापुरास परत वाड्यांत जाऊन राहिली तिच्या ह्या वैतागाने प्रजेला फारच वाईट वाटलें. पण करतात काय?

सवाई माधवरावाच्या शिक्षणाबद्दल ती नेहमी नाना फडणिसास लिही. तो आजीस भेटण्यासाठीं एकदा गंगापुरास गेला होता. गोपिकाबाईचा सर्व वेळ धार्मिक विधींत व जपजाप्यात जाई. ती आपल्या नोकराना फार प्रेमाने वागवी. साडेतीन हजार रुपये खर्च करून तिने आपली आवडती दासी, येसू, इच्या मुलाचें लग्न केलें होतें.

एकंदर विचार करतां, गोपिकाबाई अत्यंत दुर्दैवी होती, असें म्हणावें लागतें. चाळिशीच्या वयांतच नवऱ्याचा मृत्यु, एकोणीस वर्षांचा वडील मुलगा विश्वास-राव याचा मृत्यु, अठ्ठावीस वर्षांच्या माधवरावाचा मृत्यु व रमाबाईचें सती जाणें, पुढे एकोणीस वर्षांच्या नारायणरावाचा खून व नंतर चारच वर्षांनी त्याची बायको गंगाबाई इचा मृत्यु; असे कौटुंबिक आघात तिजवर पाठोपाठ येत गेले! याखेरीज, सवत राधाबाई, दीर सदाशिवराव व रघुनाथराव वगैरे पेशव्यांच्या

घरांतील इतर सर्व वयाने तिच्यापेक्षा लहान मंडळीसुद्धां तिच्या देखतच गेली. राज्याचीं अनेक स्थित्यंतरें तिला पाहावीं लागलीं. मृत्यूसमयीं तिचें स्वतःचें वय सुद्धा ६३-६४ वर्षांहून जास्त नव्हतें." [ सरदेसाईकृत–नानासाहेब पेशवा ] सन १७८८ सालीं गंगापुरासच गोपिकाबाईचें देहावसान झालें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३३७५ वि: ...
क्रमांक १०५ नों: दि: २९/८/...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१५२३०
संदर्भ शाखा

REFBK-0015239
REFBK-0015239